सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०७ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १२६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कर्तव्य भवनमुळे १५०० कोटी रुपये भाडे वाचेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी

## नवी दिल्ली येथील कर्तव्य पथवर उभारण्यात आलेल्या कर्तव्य भवन ३ चे उद्घाटन

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथील कर्तव्य पथवर उभारण्यात आलेल्या कर्तव्य भवन ३ चे आज सकाळी उद्घाटन करण्यात आले. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पांतर्गत ही पहिली कॉमन सेंट्रल सेक्रेटरीएट इमारत आहे. या इमारतीच्या उद्घाटनानंतर जनतेला संबोधित करताना पंतप्रधानांनी कर्तव्य भवन- ३ बांधण्याचे कारण सांगितले. अनेक मंत्रालयांसाठी उभारण्यात आलेल्या या इमारतीमुळे १५०० कोटी रुपये वाचल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कर्तव्य भवनमधून जनतेला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, अमृतकालमध्ये, विकसित भारताची धोरणे या इमारतींमध्ये आखले जातील, निर्णय घेतले जातील आणि येत्या काही दशकांमध्ये देशाची दिशा येथूनच ठरवली जाईल.

सेंट्रल व्हिस्टाच्या कर्तव्य मार्गावर नव्याने बांधलेल्या कर्तव्य भवनाच्या उद्घाटनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी जनतेला संबोधित केले. यावेळी ते म्हणाले, यापूर्वी, वेगवेगळ्या मंत्रालयांच्या भाड्यावर १५०० कोटी रुपये खर्च केले जात होते. या फक्त काही नवीन इमारती आणि सामान्य पायाभूत सुविधा नाहीत. तर अमृतकालमध्ये,



विकसित भारताची धोरणे या इमारतींमध्ये आखली जातील, त्यावर निर्णय घेतले जातील आणि येत्या काही दशकांमध्ये देशाची दिशा येथूनच ठरवली जाईल. कर्तव्य पथ भवनासाठी मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो. या व्यासपीठावरून मी त्याच्या बांधकामाशी संबंधित सर्व अभियंते आणि कामगारांचे आभार मानतो.

कर्तव्य पथ का बांधले?

कर्तव्य पथ का बांधले याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी म्हंटले, स्वातंत्र्यानंतर, देशाची प्रशासकीय यंत्रणा अनेक दशके ब्रिटिश काळात बांधलेल्या इमारतींमध्ये चालत राहिली. या जुन्या प्रशासकीय इमारतींमधील कामाची स्थिती खूपच खराब होती, जिथे जागेचा अभाव, प्रकाशाचा अभाव आणि कामगारांसाठी वायुवीजनाचादेखील अभाव होता. ते पुढे म्हणाले की, ही इमारत आधुनिक पायाभूत सुविधेने सुसज्ज असून, पूर्वीपेक्षा अधिक मोठी जागा येथे आहे. तसेच या इमारतीला सौरउर्जे द्वारे वीजपुरवठा केल्याचे देखील त्यांनी सांगितले. याबद्दल ते म्हणाले, कर्तव्य भवनासारख्या आधुनिक पायाभूत सुविधा केवळ लोक-केंद्रित भावनाच प्रतिबिंबित करत नाहीत तर त्या ग्रह-केंद्रित देखील आहेत. अक्षय ऊर्जेचा वापर करण्यासाठी या इमारतीच्या छतावर सौर पॅनेल बसवण्यात आले आहेत आणि त्याच्या डिझाइनमध्ये प्रगत कचरा व्यवस्थापन प्रणालींचा समावेश करण्यात आला आहे. आज, देशभरात शाश्वत, ग्रीन बिल्डिंग बांधण्याचा दृष्टिकोन वेगाने वाढत आहे.

'हे कर्तव्य आहे...'

कर्तव्य भवन बद्दल बोलताना मोदी पुढे म्हणाले, आम्ही खूप विचारमंथनानंतर या इमारतीला कार्तव्य भवन असे नाव दिले आहे. कर्तव्य पथवरील कर्तव्य भवन आपल्या लोकशाहीचा मूळ आत्मा, आपल्या संविधानाचा प्रचार करते. 'कर्तव्य' हे केवळ एका इमारतीचे नाव नाही, तर कोट्यवधी देशवासीयांची स्वप्ने सत्यात उतरवण्याची ती तपोभूमी आहे. कर्तव्य ही सुरुवात आहे, कर्तव्य म्हणजे नियती आहे. करुणा आणि कृतीच्या स्नेहाच्या बंधनात बांधलेले कर्म... हे कर्तव्य आहे. ते पुढे म्हणाले, आमचे सरकार एका समग्र दृष्टिकोनासह भारताच्या पुनर्बांधणीत गुंतले आहे. हे पहिलेच कर्तव्य भवन आहे जे पूर्ण झाले आहे, अशा अनेक कर्तव्य भवनांचे बांधकाम वेगाने सुरू आहे. आज देशाचा कोणताही भाग विकासाच्या प्रवाहापासून वेगळा नाही.

## सरला बेट विकास आराखडा व देवगाव शनि येथील बंधाऱ्यास मंजूरी देणार- देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर,दि.६ - सदगुरु संत गंगागिरी महाराजांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभलेल्या या भागातील भाविक नागरिकांच्या विकासाठी देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधारा बांधकाम व सरला बेट विकास आराख़डा यांना मंजूरी देऊ,असे आश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज देवगाव शनि येथे दिले.



देवगाव शनि ता. वैजापूर येथे सदगुरु संत गंगागिरी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता आज झाली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, संत रामगिरी महाराज, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन,आ. रमेश बोरनारे,आ. विठ्ठल लंघे,सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच अन्य अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतून येतांना समुद्राचे दर्शन होते त्याप्रमाणे इथे आल्यावर भाविकांच्या सागराचे दर्शन झाले. १७८ वर्षांची परंपरा असलेला हा अध्यात्मिक सोहळा, भाविकांची शिस्त, तत्परता, त्यांची भाविकता हे सगळं मनाला विलक्षण आनंद देणारे आहे. देशहिताच्या विचाराला मारक असणाऱ्या शक्ती उदयास येतात तेव्हा हे सांस्कृतिक आक्रमण थोपविण्यासाठी संत शक्ती मैदानात उतरते. संतांच्या विचारांचे महत्त्व त्याचमुळे अबाधित आहे.याच विचारांनी छत्रपती शिवाजी महाराजांची रयतेचे स्वराज्य मिळविले. अध्यात्माच्या शक्तीमुळे सकारात्मक उर्जा निर्माण होते आणि मला सकारात्मक कार्याची प्रेरणा मिळते.

या भागातील सरला बेटाचा विकास करण्यासाठी १०९ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी मान्यता देण्यात येईल. तसेच देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधाऱ्याची मागणीही आम्ही लवकरच पूर्ण करु असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. तसेच या सोहळ्याला दरवर्षी येईन असेही आश्वासन दिले.

मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, वारकरी संप्रदायाने जगाला विशाल दृष्टीकोन दिला.हीच आपली खरी संस्कृती आहे. संत गंगागिरी महाराजांच्या या पवित्र स्थानावर होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी १ एकर जागेवर मोठे सभागृह बांधण्यात येईल,असे त्यांनी सांगितले.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, याभागातील उच्च पातळी बंधारा बांधकामाच्या मागणीला मी दुजोरा देतो. या भागातील या क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. याभागातील अध्यात्मिक चळवळ ही आम्हा सगळ्यांना मार्गदर्शक आहे.

१७८वर्षाची परंपरा असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाचा आज सांगता सोहळा अर्थात काल्याचे कीर्तन होते. त्यास मुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यरांनी हजेरी लावली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.कार्यक्रमात सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे सप्ताह समितीतर्फे सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्री महोदय व मान्यवरांनी फुगडी खेळून सांगता सोहळ्याचा आनंद लुटला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'महावस्त्र पैठणी' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर,दि.६ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज जिल्हा माहिती कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या 'महावस्त्र पैठणी' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. देवगाव शनि ता. वैजापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता सोहळ्यास मुख्यमंत्री फडणवीस आले होते. त्यावेळी हा कार्यक्रम पार पडला.

जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन,आ. रमेश बोरनारे,आ. विठ्ठल लंघे,सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे कॉफीटेबल बुक तयार करण्यात आले आहे. वन नेशन वन प्रॉडक्ट या संकल्पनेंतर्गत जिल्हाधिकारी स्वामी यांनी पैठणी साडी या जिल्ह्याच्या उत्पादनाला चालना दिली आहे. त्यादृष्टीने पैठण येथील उत्पादन असलेल्या पैठणी साडीबाबत सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डोनाल्ड ट्रम्प यांचे भारतावर ५०% आयात शुल्क लादण्याचे आदेश

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लावण्याच्या कार्यकारी आदेशावर सही केली असून त्यामुळे अमेरिका भारताकडून होणाऱ्या काही वस्तूंच्या आयातीवर आता एकूण ५० टक्के शुल्क आकारणार आहे. व्हाइट हाऊसने याची अधिकृत घोषणा केली आहे.

या निर्णयामागील प्रमुख कारण म्हणजे भारताकडून रशियन तेलाची खरेदी. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, भारत आमच्यासोबत भरपूर व्यापार करतो, पण आम्हाला त्यांच्याशी व्यापार करता येत नाही. त्यामुळे आम्ही २५ टक्के शुल्क ठरवलं होतं, पण आता ते आणखी मोठ्या प्रमाणात वाढवणार आहोत. पुढच्या २४ तासांत हे शुल्क लक्षणीय वाढवले जाईल.

अशा प्रकारे, ट्रम्प यांनी भारताकडून होणाऱ्या आयातीवर आधीच लागू असलेल्या २५% शुल्कात आणखी २५% वाढ



केल्याने एकूण आयात शुल्क ५०% पर्यंत पोहोचले आहे.

व्हाइट हाऊसचा आदेश काय म्हणतो?

या कार्यकारी आदेशात, ट्रम्प यांनी अमेरिकेच्या घटनात्मक अधिकारांचा वापर करत रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताकडून रशियन तेलाच्या खरेदीला उत्तर देण्यासाठी भारतावर हे अतिरिक्त शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे.

या आदेशानुसार:

भारताकडून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर २५% अतिरिक्त शुल्क लागू करण्यात येईल.

हे शुल्क २१ दिवसांनंतर लागू होईल, म्हणजेच १७ सप्टेंबर २०२५ पूर्वी पोहोचलेल्या व प्रवासात असलेल्या मालावर ते लागू होणार नाही.

भारताची तीव्र प्रतिक्रिया

भारत सरकारने यावर कडक प्रतिक्रिया दिली असून परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेच्या या निर्णयाला अन्यायकारक आणि अवाजवी ठरवले आहे. भारताने असे आरोप केले की, अमेरिका आणि युरोपियन युनियन व्यापाराच्या नावाखाली भारताला लक्ष्य करत आहेत.

चए- च्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिका आणि युरोपियन देश स्वतः रशियन उर्जेशी व्यवहार करत असूनही भारतावर दबाव आणत आहेत, हे दुहेरी धोरण आहे. भारत या बाबतीत कोणताही अन्याय सहन करणार नाही. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे भारत-अमेरिका व्यापार संबंधांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## कन्नड अर्बन घोटाळा फसवणुकीपलिकडे; १९९९ च्या कायद्यानुसार कारवाईचा मार्ग खुला

**सहयोग प्र.जावळे**

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०६ ऑगस्ट - कन्नड अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटीमधील ८७.२३ लाखांच्या आर्थिक घोटाळ्यानंतर, केवळ फसवणुकीचा गुन्हा दाखल करून थांबणे पुरेसे नसून, दोषींवर कठोर आर्थिक कारवाईची प्रक्रिया त्वरित राबवणे गरजेचे आहे.

त्यासाठी महाराष्ट्र शासनाने अधिनियमित केलेला एक प्रभावी कायदा म्हणजे महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ हा असून, अशा आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तो वापरणे ही काळाची गरज ठरत आहे.या कन्नड अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या आर्थिक अनियमिततेचा फटका हजारो ठेवीदारांना बसला असून, अनेकांचे निवृत्तीवेतन, शेतीकर्जाच्या रक्कमा आणि जीवनभराची पुंजी अडकून पडली आहे.



### महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९

सहकारी संस्था किंवा वित्तीय संस्थेतील फसवणुकीच्या प्रकरणात दोषी ठरलेल्या व्यक्तींच्या मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार शासनाला मिळतो. ठेवीदारांचे नुकसान भरून काढण्यासाठी जप्त मालमत्तेचा लिलाव करून रक्कम वसूल केली जाऊ शकते. या कायद्यातील तरतुदी फक्त गुन्हा दाखल करण्यापुरत्या मर्यादित न राहता, थेट वसुलीवर भर देतात. अशा आर्थिक घोटाळ्यांमध्ये सदर कायदा लागू करण्याची प्रक्रिया हळूहळू दुर्लक्षित होत चालली आहे. त्यामुळे या कायद्याबाबत समाजात जागरूकता वाढवणे आणि तो प्रभावीपणे वापरणे, ही सार्वजनिक हिताची बाब ठरते.

आमच्या पैशांवर काही जणांनी मौज केली, आणि आम्ही आता न्यायासाठी झगडतोय, अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ ठेवीदाराने दिली आहे

चार प्रमुख गैरव्यवहार ठळकपणे उघड

सरकारी लेखापरीक्षक शेख सलाउद्दीन कुतुबुद्दीन यांच्या २०२१-२२ या आर्थिक वर्षातील तपासणीत संस्थेत झालेल्या चार प्रमुख आर्थिक घोटाळ्यांची नोंद आहे:

बिनठराव एकरकमी कर्ज योजना - ९७,९८८ नुकसान

अर्ज व कागदपत्रांशिवाय कर्जवाटप - श्वेता माडीवाले यांना ३० लाख

लिंकींग शेअर्स रकमेचा अपहार - १२.२५ लाख

मर्यादेपेक्षा अधिक कर्ज वाटप - ४४ लाख

१४ जणांविरोधात गुन्हा, पण अजूनही मोठी कारवाई नाही

जयंत कुलकर्णी, मनिषा कुलकर्णी, दशरथ सोमासे यांच्यासह १४ संचालकांविरोधात भादंवि कलम ४०९, ४०६, ४२०, ३४ व सहकारी संस्था कायदा कलम १४६ अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असला, तरी अजूनही या प्रकरणात महाराष्ट्र ठेवीदार संरक्षण अधिनियम १९९९ लावण्यात आलेला नाही. हा फक्त आर्थिक गुन्हा नसून, हजारो कुटुंबांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रकार आहे. त्यामुळे यामध्ये १९९९ च्या अधिनियमानुसार मालमत्ता जप्त करून ठेवीदारांना परतावा मिळावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

सहकारी संस्थांतील घोटाळे उघडकीस येतात, गुन्हे दाखल होतात, पण ठेवीदारांची रक्कम परत मिळते का?

हा प्रश्न वारंवार ऐकू येतो. त्यामुळे, १९९९ चा कायदा केवळ कागदावर न राहता, अंमलात येणे गरजेचे आहे.

फसवणुकीच्या घटनांमध्ये जबाबदारी थेट ठेवीदारांवर न येता, व्यवस्थापनाच्या संपत्तीतून नुकसान भरपाई होणे ही न्यायिक गोष्ट आहे.

१९९९ चा कायदा म्हणजे ठेवीदारांचा ढाल नाही, तर प्रशासनाच्या हातातील प्रभावी हत्यार आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत थकीत शेतकरी, बचतगट व लघु उद्योजकांना मदतीचा हात

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर - केंद्र सरकार तसेच राज्य सरकार सोबत बँक ऑफ महाराष्ट्र चे भाग भांडवल व प्रायोजकत्व असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत शेतकऱ्यांच्या, बचतगटांच्या तसेच लघु उद्योजकांच्या थकीत कर्जाच्या परतफेडीसाठी विविध सवलत योजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

'एक राज्य, एक ग्रामीण बँक' या धोरणांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बँक' व तत्कालीन 'विदर्भ कोकण ग्रामीण बँक' एकत्रीकरण करण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे कार्यक्षेत्र आता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ७४८ शाखा व १३ विभागीय कार्यालयांमार्फत बँक तब्बल १ कोटी ग्राहकांना बँकिंग सेवा पुरवित आहे.

राज्यात गेल्या काही वर्षांपासून विविध भागात आलेला ओला किंवा कोरडा दुष्काळ, कोविड महामारी तसेच काही ठिकाणच्या भौगोलिक परिस्थिती मुळे बँकेचे बरेचसे शेतकरी, बचतगट व लघु उद्योजक ग्राहकांचे कर्ज थकीत स्वरुपात असून त्यामुळे त्यांची आर्थिक पत खालावली आहे. यासोबतच त्यांना नविन कर्ज मिळण्यास देखील अडचण निर्माण होत आहे. शेतीच्या मशागतीसाठी लागणारे पीक कर्ज देखील वेळेवर नूतनीकरण न केल्यामुळे शेतकऱ्यांना वाढीव कर्जाचा लाभ घेता येत नाही परंतु त्यासोबतच विविध शासकीय योजनांद्वारे



मिळणाऱ्या व्याज परताव्यापासून देखील शेतकरी वंचित राहत आहे.

बँकेने अशा सर्व थकीत कर्जधारकांसाठी अनियमित पीक कर्ज नियमित करण्यासाठी 'शेतकरी आधार योजना', थकीत पीक कर्जासाठी 'शेतकरी नवसंजीवनी योजना', थकीत शेती आधारित मुदत कर्जासाठी 'शेतकरी समाधान योजना', बचतगटाच्या थकीत कर्जासाठी 'गटबंधन सहायता योजना' तसेच लघु उद्योजक यांच्या थकीत कर्जासाठी 'उद्योजक दिलासा योजना' या विशिष्ट योजना बँकेमार्फत पात्र कर्जदारांसाठी प्रस्तुत करण्यात आल्या आहेत.

या विविध योजनांमध्ये बँकेतील तब्बल ३ लाख १५ हजार खातेदार पात्र होणार आहेत. अस्मानी संकटामुळे मेटाकुटीस आलेल्या व थकीत कर्जामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या बळीराजाला, वसुलीचा तगादा न लावता विशेष सवलतीच्या रूपाने साथ देऊन त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या योजनांचा फायदा होणार आहे. यातील ठराविक योजनांमध्ये पात्र ठरणाऱ्या खातेदारांसाठी कर्ज सवलतीसोबतच नविन तसेच वाढीव कर्जाची तरतूद देखील करण्यात आली आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील वरील योजनांसाठी पात्र सर्व खातेदारांची यादी बँकेच्या सर्व शाखा व कार्यालये या ठिकाणी उपलब्ध असून बँकेमार्फत देखील पात्र खातेदारांना स्मरणपत्र, वैयक्तिक भेटी गाठी तसेच गावात शिबीर घेऊन संपर्क साधला जात आहे. सदर योजना या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ग्राह्य राहणार असून सर्व पात्र खातेदारांनी देखील आपल्या शाखेशी संपर्क साधावा आणि या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष श्री. मिलिंद घारड यांच्यामार्फत याप्रसंगी करण्यात आले आहे.

## दारू पाजून मित्राचा घातपात? दोघांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा; पोलिस कोठडीत रवानगी

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०६ ऑगस्ट - हिवरखेडा - गौताळा रोडवरील शेतात १९ जुलै रोजी सापडलेल्या मृतदेह प्रकरणाचा उलगडा होत असून, ही मृत्यूची नैसर्गिक घटना नसून मित्रांनीच अति प्रमाणात दारू पाजल्याने झालेला घातपात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी त्यांना अटक करून तीन दिवसांची कोठडी मिळवली आहे.

मृत युवकाचे नाव धारसिंग धरमु जाधव (वय ३०, रा. हिवरखेडा गौ.) असे असून, तो १९ जुलै रोजी गावाजवळील शेतात संशयास्पद स्थितीत मृतावस्थेत आढळून आला होता. ही बाब प्रथमदर्शनी अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू वाटत होती; मात्र पोलिसांनी सुरू केलेल्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली.

तपासात असे निष्पन्न झाले की, धारसिंग याचे मित्र कार्तिक राजू जाधव (वय २७) व किशोर भारत जाधव (वय ३२) यांनी त्याला दुचाकीवरून गावाबाहेरील गौताळा अभयारण्यात नेले. तिथे त्याला जबरदस्तीने अत्याधिक प्रमाणात दारू पाजण्यात आली. त्यानंतर धारसिंग याला त्रास होऊ लागला. मात्र मदतीऐवजी ते त्याला तसाच ठेऊन पळून गेले, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

घटनेची गंभीरता लक्षात घेता, कन्नड पोलिसांनी दोन्ही आरोपींना ६ ऑगस्ट रोजी अटक केली. त्यांना कन्नड येथील दिवाणी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना दि.०८ पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी करत आहेत मृत धारसिंगचा मृत्यू अपघाती नव्हे, तर मित्रांच्या निष्काळजीपणामुळे व जबरदस्तीमुळे झाल्याचा संशय बळावल्याने प्रकरणाने वेगळे वळण घेतले आहे.

# आ.रमेश कराड यांचा साडेसात तास चालला जनता दरबार

## अनेक प्रश्न सोडवणूक तर इतर प्रश्न महिनाभरात निकाली काढण्याच्या अधिकाऱ्यांना यांनी दिल्या सूचना...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापुर, दि.६ ऑगस्ट -**

लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आणि अडीअडचणी समजून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेला रेणापूर तालुक्याचा जनता दरबार तब्बल साडेसात तास अखंडपणे सुरू होता. या जनता दरबारास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो जणांनी आपल्या प्रलंबित असलेले प्रश्न आमदार महोदयासमोर मांडले असता या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच त्यांनी सोडविले. इतर प्रश्न संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याना तात्काळ कारवाई करून महिनाभरात निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.

रेणापूर तालुक्यात पहिल्यांदाच लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी ५ ऑगस्ट मंगळवार रोजी तालुक्यातील गोरगरीब सर्वसामान्य माणसाचे दुःख वेदना त्यांचे प्रश्न आणि अडीअडचणी समजून घेता याव्यात त्यांच्याशी संवाद साधता यावा यासाठी रेणापूर येथील श्री रेणुकाई मंगल कार्यालयात जनता दरबार घेतला. या कार्यक्रमास संपूर्ण तालुकाभरातील जनतेने मोठा प्रतिसाद देत आपल्या अडीअडचणी आमदार महोदयासमोर मांडल्या.

सकाळी ११ वाजता सुरू झालेला जनता दरबार सायंकाळी साडेसहा वाजता संपला तब्बल साडेसात तास अखंडपणे सुरू असलेल्या या जनता दरबारातून अनेकांचे प्रश्नमार्गी लागल्याने उपस्थित नागरिकांतून मोठे समाधान व्यक्त केले जात होते. पंधरा वर्षानंतर रमेशआप्पांच्या माध्यमातून जनतेतील आमदार बघायला मिळाला असल्याची अनेकांनी भावना व्यक्त केली तर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या रेणापूर येथील बाजार समितीच्या परिसरात झालेल्या जनता दरबारची अनेकांनी आठवण केली.

या जनता दरबारास उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, रेणापूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतिक लंबे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष महेन्द्र गोडभरले, शरद दरेकर, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, अनिल भिसे, अनंत चव्हाण, बाबासाहेब घुले, दशरथ सरवदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातून निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी माझ्या आमदारकीचा उपयोग गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी करणार असल्याचे सांगून मतदार संघातील जनतेच्या अडीअडचणी, प्रश्न समजून घेण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी मतदार संघात चार ठिकाणी जनता दरबार घेणार असल्याचे घोषित केले होते त्यानुसार मुरुड आणि ममदापूर नंतर तिसरा रेणापूर येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. प्रचंड मोठा प्रतिसाद मिळालेल्या या जनता दरबारमध्ये रेणापूरसह विविध गावातील नागरिकांनी शेतरस्ते, घरकुल, समशानभूमी,शिव रस्त्यावरील अतिक्रमणे, शेतीतील वीजप्रश्न, कबाले, समाज मंदिर, बस सेवा सुरू करणे, निराधारच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, आरोग्य विषयक तक्रारी, विविध गावातील अवैध दारू विक्री व इतर अवैधधंदे ग्राम सेवक तलाठी गावात येत नाहीत यासह विविध प्रलंबित असलेल्या समस्या नागरिकांनी मुक्तपणे मांडल्या.



वाला येथील महिलांनी गावातील दारूबंदी तात्काळ करण्याची आग्रहाची मागणी केली असता आ रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यात प्रत्येक गावातील अवैद्य दारू विक्री आणि अवैध धंदे तात्काळ बंद करण्याचे तसेच सिधंगाव येथील गाव गुंडाचा तात्काळ बंदोबस्त करावा असा आदेश संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना दिले. अतिक्रमणे तात्काळ काढून सर्व रस्ते मोकळे करावेत, जनतेच्या मूलभूत प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, शासनाच्या विविध योजना पात्र गोरगरीब लाभार्थ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, तळागाळातील माणसाला न्याय द्यावा, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सेवक यांनी नियुक्ती दिलेल्या गावात जाऊन ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडवाव्यात अशा महत्त्वपूर्ण सूचना केल्या. जनता दरबाराच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाशी आ रमेशआप्पा कराड यांनी संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घेतले. जे शक्य आहे त्या प्रश्नांचा निर्णय जागेवरच केले इतर सर्वच निवेदनावर महिनाभरात कार्यवाही झालेली दिसेल अडचणीच्या विषयात निश्चितपणे योग्य तो मार्ग काढला जाईल असा दिलासाही आमदार रमेश आप्पा कराड यांनी यावेळी अनेकांना दिला. गटविकास अधिकारी सुमित जाधव यांनी जनता दरबार कार्यक्रमाचे प्रस्तावित केले तर शेवटी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी आणि नागरिकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. याप्रसंगी रेणापूर तालुका भाजपाच्या वतीने आ रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या जनता दरबार कार्यक्रमास गोविंद नरहरे, विजय गंभीरे, कुलदीप सूर्यवंशी, अमर चव्हाण, नरसिंग चपटे, वसंत करमोडे, विजय चव्हाण, सुकेश भंडारे, श्रीकृष्ण पवार, अच्युत कातळे, श्रीकृष्ण जाधव, गणेश चव्हाण, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, लक्ष्मण यादव, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोबडे, धनंजय पवार, सुनील चेवले, रमेश खाडप, महेश गाडे, किशन शिरसागर, दीपक पवार, संजय डोंगरे, ललिता कांबळे, अनुसया फड, शीला आचार्य, मनीषा मुंडे, राजकुमार आलापुरे, शेख अजीम, नाथराव गीते, रमाकांत फुलारी, दिनकर राठोड, आप्पासाहेब पाटील, रमा चव्हाण, संतोष राठोड, भाऊसाहेब गुळबिले, श्रीमंत नागरगोजे, सिद्धेश्वर मामुडगे, गोविंद देशमुख, बालाजी केंद्रे, अजित पाटील, नारायण राठोड, राज जाधव, शेख जलील, राजकुमार मानमोडे, सुरेश बुड्डे, बालाजी फड, संतोष चव्हाण अजय राठोड, नारायण जोगदंड यासह रेणापूर तहसीलचे नायब तहसीलदार तानाजी यादव, प्रतीक्षा लांडगे, बांधकाम विभागाचे उप अभियंता एल डी देवकर, तालुका कृषी अधिकारी नितीन कांबळे, महावितरणचे उपअभियंता चांगदेव काळे,भूमि अभिलेखचे लांडेकर, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, राष्ट्रीय महामार्गचे निलेश मुंडे, राज्य परिवहन महामंडळाचे बाळासाहेब राठोड, आरटीओ प्रकाश मुळे महिला बालकल्याण विभागाचे साईनाथ वंगारे, रेणापूरचे पीआय दत्तात्रय निकम, चाकूरचे अच्युत सूर्यवंशी यांच्यासह लघु पाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पाणीपुरवठा विभाग, पशुधन विकास विभाग, गटशिक्षणाधिकारी, वन परिमंडळ अधिकारी जिल्हा रेशीम उद्योग, घरकुल आणि नरेगा विभागाचे अधिकारी, विस्तार अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी अंगणवाडी पर्यवेक्षिका उपस्थित होत्या.

# लातूरला होणार राज्य राखीव पोलीस दल गट कार्यान्वित

## आ.अभिमन्यू पवारांची मागणी...मुख्यमंत्र्यांकडून तत्त्वत:मंजुरी...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६ ऑगस्ट -**

लातूर, धाराशिव, बीड व नांदेड जिल्ह्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण म्हणून लातूर येथे राज्य राखीव पोलीस दल गट मंजूर करुन कार्यान्वित करावा अशी मागणी आ.अभिमन्यू पवार त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात मंजुरीसाठी सकारात्मक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यानी अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांना दिले असून राज्य राखीव पोलीस दल गटाला तत्तवता मंजूरी देण्यात आली आहे.



लातूर महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे शहर आहे. जिल्ह्यातील काही भागात दहशतवादी व देश विघातक कार्यवाहीत सहभागी असलेल्या अतिरेकी कनेक्शन समोर आले आहे. तसेच लातूर जिल्ह्यातगत कर्नाटक सीमा असल्याने व वेळेवेळी होणाऱ्या महाराष्ट्रातील आंदोलनाच्या घटनेमुळे लातूर जिल्हा संवेदनशील झाला आहे. कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत कांही घटना घडल्यास नजीकचे जालना येथील राज्य राखीव पोलीस दल २८० किलोमीटर आहे.व त्यांना पोहचण्यासाठी किमान ५ ते ६ तास तर सोलापूर येथील राज्य राखीव पोलीस दल जवळपास १२५ किमी अंतरावर असून त्यांना लातूर येथे पोहंचण्यासाठी किमान ३ तास लागतात. येथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा पोलीस दल अपुरे पडणार आहे.तसेच लातूर, नांदेड, धाराशिव आणि बीड येथे राज्य राखीव पोलीस दल गट नसल्याने तसेच या जिल्ह्यांना अंतराच्या दृष्टीने लातूर जवळचे आणि मध्यवर्ती ठिकाण असल्याने या जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेसाठी लातूर येथे राज्य राखीव पोलीस दल गट मंजूर करून कार्यान्वित करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.अशी माहिती आ अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली.

लातूर, धाराशिव, नांदेड, बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेबाबत निर्माण झालेली स्थिती तत्परतेने नियंत्रणात आणण्यासाठी लातूर येथे राज्य राखीव पोलीस दल गट मंजूर करून कार्यान्वित करण्याबाबत मागणी केली आहे. यासंदर्भात मंजुरीसाठी सकारात्मक प्रस्ताव प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यानी अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांना दिले. त्यामुळे राज्य राखीव पोलीस दल गटाला तत्तवता मंजूरी देण्यात आली आहे.याचबरोबर आमदार पवार यांनी लातूर विमानतळाच्या विषयाचा पाठपुरावा केला असता पुढील दोन वर्षांमध्ये लातूर विमानतळावर नाईट लँडिंग सुरू होईल हे उद्दिष्ट समोर ठेवून विमानतळाचा विकास केला जाईल असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

### मुख्यमंत्र्यांसोबत अनेक विषयांवर चर्चा

लातूर ते कल्याण महामार्ग सध्या प्रस्तावित आहे. पण या महामार्गावरील वाहनांना कल्याण वरुन मुंबईला जाताना वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे या रस्त्यात बदल करुन लातूर - अहिल्यानगर - माळशेज घाट मार्गे बदलापूर - वडोदरा एक्स्प्रेस वे वरील बोगद्यातून पनवेल जेएनपीटी असा महामार्ग मंजूर करण्यात यावा. अशी मागणी आ अभिमन्यू पवार यांनी केली. असता मुख्यमंत्र्यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना उचित कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. औसा मतदारसंघातील बेलकुंड उपसा जलसिंचन योजना, औसा शहर विकास आराखडा, भूकंपग्रस्त गावांचा पुनर्विकास आराखडा अशा विविध विषयांचा पाठपुरावा केला सर्वच विषय कालबध्द पद्धतीने मार्गी लावण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

# विश्वेश्वरय्या सायन्स महाविद्यालयाचा शैक्षणिक शुभारंभ

## डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून अधिक परिणामकारक शिक्षणपद्धती यावर टाकला प्रकाश



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६ ऑगस्ट -**

लातूर जिल्ह्यातील अग्रगण्य विश्वेश्वरय्या शैक्षणिक संस्थाच्या लातूर येथील विश्वेश्वरय्या जुनिअर सायन्स महाविद्यालयाच्या नवप्रवेशित ११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रास्ताविक कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्तानेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमास श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकृर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, श्री विश्वेश्वरय्या कनिष्ठ महाविद्यालय लातूरचे प्राचार्य अमोल कुंभार, श्री विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी लातूरचे प्राचार्य किशोर जेवे,,श्री विश्वेश्वर महाविद्यालय लातूरचे प्राचार्य डा. संगमेश्वर धाराशिवे, ब्लू बर्ड इंटरनॅशनल स्कूल आलमलाचे प्राचार्य योगेश माशाळकर, पालक प्रतिनिधी माधव लवटे, प्रा. प्रविण धाराशिवे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्राचार्य किशोर जेवे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

प्रभाकर कापसे यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी संस्थेच्या नैतिक मूल्याधिष्ठित कार्यपद्धती, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापन, सुसज्ज आणि अद्ययावत प्रयोगशाळा सुविधा, तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून अधिक परिणामकारक शिक्षणपद्धती यावर प्रकाश टाकला.

बसवराज धाराशिवे म्हणाले, विद्यार्थ्यांचे आजचे वय म्हणजे स्वप्न पाहण्याचे, आणि त्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी संकल्पपूर्वक संघर्ष करण्याचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपली दिशा ठरवावी आणि त्या दिशेने सातत्यपूर्ण वाटचाल करावी.

शिक्षण हे केवळ गुण मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्य, शिस्त, मेहनत, आणि स्वतःवर विश्वास या चार बाबी आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनवाव्यात. असे आवाहन केले. योगेश जाधव आणि शीतल डोंगरे यांनी संयुक्तपणे सुत्रसंचालन केले.

याच दिवशी महाविद्यालयाचे नियमित वर्ग देखील सुरू करण्यात आले, आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने शैक्षणिक सत्रात सहभाग नोंदवला. कार्यक्रम नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी एक सकारात्मक व प्रेरणादायी अनुभव ठरला.तसेच शैक्षणिक वाटचालीस एक सुंदर सुरुवात देणारा आणि संस्थेच्या नियोजनबद्धतेचे आणि शैक्षणिक बांधिलकीचे प्रतीक ठरला आहे.

# महाराष्ट्र महाविद्यालयात डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त रक्तदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ ऑगस्ट -**

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग,राष्ट्रीय छात्र सेना विभाग व डॉ.भालचंद्र ब्लड सेंटर लातूर यांच्या वतीने कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यात एकूण २१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष श्री विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा पोलीस स्टेशनच्या पोलीस उप निरीक्षक माने अनुसया या उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र शिक्षण समितीचे सचिव बब्रुवान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम,

उपप्राचार्य डॉ.बी.एस.गायकवाड, उपप्राचार्य पी.पी.गायकवाड, माजी प्राचार्य डॉ.एम. एन.कोलपुके राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.व्हि.पी.सांडूर, प्रा.एस. एस.बदनाळे,प्रा.श्रीकृष्ण दिवे,५३ महा. बटा. एनसीसी लातूर संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ.सचिन बसुदे डॉ.भालचंद्र ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी दिगंबर पवार व त्यांचे सहकारी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जुलैमध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंडसाठी ग्राह्य धरण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

सध्या इयत्ता १२ वी व सीईटी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सीईटी अंतर्गत कॅप राऊंड सुरू आहेत. यामध्ये दि. २२ जुलैपर्यंत अर्ज दाखल केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंती क्रमांक देण्यासाठी ग्राह्य व पात्र केलेले आहे. मार्च-एप्रिल २०२५ महिन्यात परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ते अर्ज करता आलेले आहेत. मात्र, जुलै २०२५ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल दि.२९ जुलै रोजी लागलेले आहेत. त्यामुळे त्यांनी निकाल लागल्यानंतर अर्ज दाखल केलेले आहेत. कॅप राऊंड सुरू असून जुलैमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पसंती क्रमांकसाठी पात्र धरले जात नाही. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे जुलैमध्ये परीक्षा दिलेल्या व उत्तीर्ण झालेल्या त्या सर्व विद्यार्थ्यांना कॅप राऊंडसाठी पात्र ठरवून त्यांच्यावरील अन्याय दूर करावा, अशी मागणी पालक मल्लिकार्जुन दशरथ सोनवणे यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांसह उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्यासह संबंधित मंत्र्याकडे दि.६ ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सध्या इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सीईटी अंतर्गत कॅप राऊंड प्रक्रिया सुरू आहे. मात्र यासाठी दि. २२ जुलैपर्यंत अर्ज दाखल करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या कॅप राऊंडमध्ये पसंती क्रमांक करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. जुलै २०२५ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी १२ वी विज्ञानची परीक्षा दिलेली आहे, त्या परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने दि. २९ जुलै रोजी लागलेला आहे. त्याची मार्कशीट देखील अद्यापपर्यंत आलेली नाहीत.

यामध्ये माझी कन्या भावना हिचा देखील समावेश आहे. तिने इंजिनिअरिंगसाठी दि.१ ऑगस्ट रोजी अर्ज दाखल केला. तर पडताळणीनंर पुन्हा दि.२ ऑगस्ट रोजी तो अर्ज दाखल केला. त्यानंतर सीईटीचा कॅप राऊंड प्रक्रियेसाठी मेसेज येणे क्रमप्राप्त होते. मात्र, तो मेसेज आलेला नाही.

त्यामुळे दि.६ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाची पसंती क्रमांक टाकण्यासाठी वेबसाईटवर गेलो असता तो ऑप्शनच येत नाही. त्यामुळे सीईटी हेल्पलाइन क्र. ९१७५१०८६१२ या क्रमांकावर ती संपर्क साधला असता ज्या विद्यार्थ्यांनी दि.२२ जुलैपर्यंत अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांच्यासाठी कॅप राऊंड आहे. त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांना कॉलेजच्या इन्स्टिट्यूट स्तरावर प्रवेश घ्यावा, लागेल असे सांगितले. त्या विद्यार्थ्यांचा निकाल दि.२९ जुलै रोजी लागला आहे. त्यामुळे दि.२२ जुलै पर्यंत अर्ज भरणे अशक्य होते.

कारण त्यासाठी आवश्यक असणारे निकष यामध्ये विद्यार्थी पास किंवा नापास तसेच त्या विद्यार्थ्यास किती गुण प्राप्त झाले आहेत हे माहिती होऊ शकत नव्हते. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी फेर परीक्षा दिली आहे व ज्यांनी दि.३३ जुलै नंतर इंजिनियरिंगसाठी अर्ज दाखल केलेले आहेत.

त्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यासोबत कॅप राऊंडसाठी ग्राह्य धरणे व पात्र ठरविणे अपेक्षित आहे. तसे न झाल्यास सदरील विद्यार्थ्यांकडून फीस भरमसाठ आकारली जाणार आहे.

त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांसाठी हे अन्यायकारक असून दि.२२ जुलै नंतर अर्ज दाखल केलेल्या आणि राज्यातील फेरपरीक्षा दिलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना शासनाच्या (सीईटी) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे त्या राऊंडसाठी पात्र ठरविण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करावा, अशी आग्रही मागणी सोनवणे यांनी केली आहे.

विद्या विकास प्रतिष्ठान,सोलापूर

**व्ही व्ही पी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर.**

NAAC Accredited & ISO 9001:2015 Certified

७२/२ब, सोरेगांव, डोणगांव रोड, सोलापूर - ४१३००८ मो. 8380030555

Approved By AICTE, DTE, Mumbai & Affiliated to DBATU, Lonere.

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६**

| कोर्सचे नाव | Intake | Choice Code |
|---|---|---|
| आर्टिफिशियल इंटिलीजेन्स् अँन्ड डाटा सायन्स | 60 | 632199510 |
| कॉम्प्युटर सायन्स अँन्ड इंजिनिअरींग | 120 | 632124210 |
| सिव्हील इंजिनिअरींग | 30 | 632119110 |
| इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | 60 | 632129310 |
| इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | 60 | 632137210 |
| मेकॅनिकल इंजिनिअरींग | 30 | 632121210 |

राष्ट्रीय स्तरावरील NAAC मानांकन प्राप्त असलेली संस्था

**DTE CODE EN-06321**

- प्रथम वर्ष CAP ROUND-1 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. ०५/०८/२०२५ ते ०७/०८/२०२५
- DIRECT SCEOND YEAR (DSE) CAP ROUND-2 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. १०/०८/२०२५ ते १२/०८/२०२५

" Think Placement Think VVP"

Dr. Arun N. Gaikwad, CAMPUS DIRECTOR & PRINCIPAL | Hon. Dr. G. K. Deshmukh, FOUNDER CHAIRMAN | Hon. Shri. Amol (Nana) Chavan, PRESIDENT

प्रवेशासाठी संपर्क

प्रा. राजेंद्र सु. चव्हाण 9822174477

प्रा. जितेश के. रोमन 9545935455

टिप: व्ही.व्ही.पी. सुविधा केंद्र रविवार व सुट्टीच्या दिवशी सुरू राहतील.

# स्नेह सावली मध्ये ५५ वयोवृद्ध व आजारग्रस्तांना मायेची सावली

(नारायण गायकवाड)

छत्रपती संभाजीनगर : सर्व वयोगटातील अंथरुणावर खिळलेल्या, आजारी, परावलंबी व्यक्तीसाठी शास्त्रशुद्धरित्या सेवा सुश्रुषा मिळावी या उद्देशाने समविचारी डॉक्टरांनी एकत्र येऊन स्नेह सावली केअर फाउंडेशन छत्रपती संभाजी नगर संचलित स्नेहसावली केअर सेंटर हा प्रकल्प सात वर्षांपूर्वी सुरू केला. सध्या येथे ५५ वयोवृद्ध व आजारग्रस्तांवर उपचार चालू आहे. येथे भेट दिली असता एक प्रकारे स्नेह सावलीमध्ये या आजारग्रस्तांना मायेची सावली मिळाली असे जाणवले.



या ठिकाणी ३५ कर्मचारी असून यामध्ये, १० डॉक्टर सेवा म्हणून काम पाहतात तर मानसिक उपचार तज्ञ, यांच्यासह मदतनीस कर्मचारीही आहेत. मुंबई पुणे हैदराबाद आदी मोठ्या शहरातून या ठिकाणी वयोवृद्ध व दुर्धर आजार ग्रस्त उपचार घेत असून रुग्ण बरा झाल्यानंतर त्यांना सुट्टी दिली जाते. आतापर्यंत हजारो रुग्ण येथे उपचार घेऊन गेल्याचे डॉक्टर बालाजी असेगावकर यांनी सांगितले. त्यावेळी डॉ. उज्वला खाडे, डॉ. शिल्पा असेगावकर,व्यवस्थापक अक्षया पाटील उपस्थित होत्या.

पुढे बोलताना डॉक्टर बालाजी असेगावकर सध्या स्नेह सावली कार्य भाडे तत्वावरील इमारतीमध्ये चालू आहे. तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित परिचारिका, केअर गिव्हर्स, समुपदेशक, फिजिओथेरपिस्ट ह्यांच्या साह्याने एकाच छताखाली मिळणारी शुश्रूषा, वैयक्तिक स्वच्छता, आहार, व्यायाम, समुपदेशन ई. आवश्यक सुविधा यामुळे परावलंबी व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता वाढून त्याचे पुनर्वसन होण्यास मदत होत आहे. आजच्या काळात या उपक्रमाची वाढती गरज लक्षात घेता भाडेतत्वावरील जागा कमी पडत आहे. त्यामुळे नवीन इमारत उभारणीचा संकल्प घेतला.

हा आगामी प्रकल्प १५० व्यक्तीसाठी क्षमता असणारा आहे. यामध्ये सुसज्ज असे फिजिओथेरपी युनिट, न्यूरो रिहाबिलिटेशन, जिरीयाट्रिक ओ पी डी असे समाज उपयोगी प्रकल्प त्याद्वारे कार्यान्वित काण्यात येत असल्याचे सांगितले.

छत्रपती संभाजीनगर मधीलच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र व इतर राज्यातील गरजू व्यक्तीसाठी हे एक सुसज्ज नर्सिंग केअर सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. जेथे गरीब निराधार व्यक्ती ही याचा लाभ घेऊ शकतील.

सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सुरु केलेला हा प्रकल्प आज लोकाश्रेयामुळे प्रगतीपथावर आहे. संस्थेला देणगीद्वारे मिळालेल्या जागेवर एक अत्याधुनिक नर्सिंग केअर सेंटर उभारण्याचे काम कसोशीने सुरु आहे. आजपर्यंत अनेक दानशूर व्यक्ती व विविध कंपन्यांनी सी एस आर च्या माध्यमातून केलेल्या मदतीमुळे पहिल्या टप्प्याचे बांधकाम अंतिम चरणात पोहचले आहे पण निधीच्या कमतरतेमुळे या समाज उपयोगी कार्याच्या पूर्णत्वाला विलंब आहे. जे सहृदय या प्रकल्पासाठी मदत करू इच्छितात त्यांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन या वेळी डॉ बालाजी असेगावकर यांनी केले.

# एमजीएममध्ये 'तुकोबा : चिंतन आणि समीक्षा' ग्रंथाचे प्रकाशन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या भारतीय तसेच विदेशी भाषा संस्थेतील मराठी विभाग, तिफण वाचक चळवळ, चिन्मय प्रकाशन, भाषा, साहित्य, संस्कृती व संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने संत साहित्याचे साक्षेपी संशोधक डॉ. सुभाष बागल लिखित 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन' या बहुचर्चित, राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त चिंतनशील ग्रंथावर संपादित 'तुकोबा : चिंतन आणि समीक्षा' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आईन्स्टाईन सभागृह, एमजीएम परिसर येथे संपन्न झाला.

या प्रकाशन सोहळ्यास संत साहित्याचे अभ्यासक डॉ.सतीश बडवे, विचारवंत डॉ.एकनाथ पगार, संत साहित्याचे अभ्यासक डॉ.न.ब.कदम, लेखक डॉ. सुभाष बागल, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, डॉ.दत्तात्रय डुंबरे, डॉ. शिवाजी हुसे, प्रकाशक विश्वंभर कुलकर्णी, डॉ.राम गायकवाड, डॉ.मारुती गायकवाड व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभ्यासक डॉ.सतीश बडवे म्हणाले, 'तुकोबा : चिंतन आणि समीक्षा' या समीक्षापर ग्रंथाचे संपादन चांगल्याप्रकारे केले असून संपादकांची दृष्टी चिकित्सक आहे. तुकोबांच्या विचारांचा वारसा जतन करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. ज्ञानोबा – तुकाराम हा महाराष्ट्राचा मंत्र असून महाराष्ट्रीयन मन संतांच्या साहित्यातून व्यक्त झालेले आहे.

लेखक डॉ.सुभाष बागल यांच्या लिखाणात मानवतावाद आहे. आजच्या भयमुक्तीचा पास तुकोबा – विनोबा आहेत. आजच्या डिजिटल युगामध्ये तुकोबांची नितांत गरज असून त्यांच्यातील माणुसपण आपल्याला जवळचे वाटते. विशेषत : आपल्याला आपल्या मार्गावरून धडपणे चालविण्याची क्षमता तुकोरामांच्या लेखणात असल्याचे विचारवंत डॉ.एकनाथ पगार यांनी यावेळी सांगितले.

संत साहित्याचे अभ्यासक डॉ.न.ब.कदम म्हणाले, 'तुकोबा : चिंतन आणि समीक्षा' हा ग्रंथ समीक्षेवरची समीक्षा आहे. अनेक वर्षाच्या चिंतनातून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. लेखकांनी आपल्या प्रयत्नांनी उत्कृष्ट असा हा ग्रंथ लिहिला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेखक डॉ.सुभाष बागल यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन बाभुळगावकर यांनी केले तर आभार डॉ.मारोती गायकवाड यांनी मानले.

# ज्यांच्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवले जाते, अशा मुलांचा बहिष्कार करा : विरंजन सागरजी महाराज




छत्रपती सभाजीनगर – श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर येथे प्रवचनात . मुनिश्री म्हणाले की, वृद्धत्व हे जीवनातील शाप नाही, तर एक वरदान आहे. माणूस वाईट दोन प्रकारे होतो – एक तर वयाने मोठा होतो आणि दुसरा परिस्थितीच्या फटक्याने बदलतो.

वृद्धत्व हे गंजलेल्या लोखंडासारखे असते, परंतु या अवस्थेत पुण्य कमावण्याची संधी असते. माणूस आयुष्यात दोनदा घरातून बाहेर पडतो – एकदा शिक्षणासाठी बालपणी, आणि दुसऱ्यांदा ५५ वर्षांनंतर शांततेसाठी. वृद्धावस्था म्हणजे ज्ञानाची पोटली आणि अनुभवाचा खजिना आहे. त्या कुटुंबांचे नशीब चांगले असते ज्यांच्याकडे वडीलधारी मंडळी असतात.

मुनिश्री म्हणाले की, जर तुम्ही आजोबा झाला असाल, तर 'दादागिरी' सोडावी आणि वैराग्य स्वीकारावे. आपल्या प्रवचनात त्यांनी सांगितले की, मंदिरातील मूर्ती माणसांनी बनवल्या, पण माणूस घडवणारे आई-वडीलच असतात. त्यामुळे आई-वडील हेच खरे देव आहेत आणि त्यांचा मान-सन्मान करणे आवश्यक आहे.

आज जे वृद्धाश्रम उघडले जात आहेत, ते आपल्या संस्कृतीसाठी शरमेची बाब आहे. ज्या माता-पित्यांना दोन-चार मुले असूनही वृद्धाश्रमात जावे लागते, ते आपल्या समाजाचे अपयश आहे. आजची नवविवाहित पिढी केवळ पैशाच्या मागे लागली आहे आणि त्यांनी आपल्या वृद्धांचे महत्त्व समजणे बंद केले आहे.

मुनिश्री पुढे म्हणाले की, बुढापण हे विषाद नसून प्रभूचा प्रसाद आहे. फ्रेंडशिप डे च्या निमित्ताने त्यांनी सांगितले की, खरे मित्र जर कुणाला बनवायचे असेल, तर प्रभू किंवा आपले आई-वडील यांनाच आपला मित्र मानावे. कारण फक्त आई-वडीलच आपल्या मुलांना नेहमी आशीर्वाद देतात.

मुनिश्रींनी वृद्धापकाळ सुखकर होण्यासाठी चार सूत्रे दिली: स्वस्थ जीवन जगावे – व्यायाम करा आणि प्रभूचे भजन करा. जास्त टोका-टोकी करू नये – घरात शांती ठेवा. मोह-माया आणि व्यावसायिक ताणतणावापासून दूर राहा – प्रभूचे स्मरण करा. संपत्ती संपूर्णपणे मुलांच्या नावे करू नका – काही भाग स्वतः साठी ठेवा, म्हणजे वृद्धापकाळात आत्मसन्मान टिकतो. युवक भविष्यकाळात जगतो, तर वृद्ध भूतकाळात. तुमची वृत्ती जशी असेल, तसा तुमचा भविष्यकाळ घडेल. म्हणून चांगली वृत्ती ठेवा, असेही मुनिश्रींनी सांगितले. शहरातील अनेक मान्यवरांसह हजारोंच्या संख्येने श्रावक-श्राविकांनी धर्मप्रवचनत उपस्थित होत.

---

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे स्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. २४०/२०२५

अर्जदार:- १. मजुरी, (बहिण) व्दारकाबाई माणिकचंद तेली, वय ७० वर्षे, धंदा रा. कंकराळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. लक्ष्मीबाई संजय तेली, वय ५० वर्षे, धंदा मजुरी (बहिण), रा. वाकी, ता. जामनेर, जि. जळगांव, ३. रुख्माबाई रामकृष्ण तेली, वय ८४ वर्षे, धंदा मजुरी, (बहिण), रा. खडकदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगांव.

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत देविदास माणिकचंद तेली हे दि. ०३/१२/२०२४ रोजी कंकराळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत देविदास माणिकचंद तेली यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २६/०९/२०२५

आज दि. ०५/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

---

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

फिरकोळ दिवाणी अर्ज क, २३१/२०२५

अर्जदार: १. शेख जयतुन बी शेख फत्तु, वय-७२ वर्षे, धंदा मजुरी, (पत्नी) २. दिलावर फत्तु शेख, वय-५७ वर्षे, धंदा मजुरी (मुलगा), ३. शेख गुलाब शेख फत्तु, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, (मुलगा), ४. बिसमिल्ला फत्तु शेख, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, (मुलगा), ५. दादामिया फततु शेख, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी, (मुलगा), ६. शेख अनीस शेख फत्तु, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी, (मुलगा), क. १ व ३ ते ६ रा. पळाशी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. क. २ रा. नेरी, ता. जामनेर, जि. जळगांव.

विरूध्द

गैरअर्जदारः निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत फत्तु अब्दुल शेख हे दि. १०/०१/२०२४ रोजी कंकराळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात बरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत फत्तु अब्दुल शेख यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०९/०९/२०२५.

आज दि. ०५/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

---

# स्वातंत्र्य दिन २०२५ साठी लॅपटॉपवर खास ऑफर

मुंबई : तैवानची टेक कंपनी एसुस भारताच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत विविध उत्पादनांवर आकर्षक ऑफर्स घेऊन आली आहे. या स्वातंत्र्य दिनाच्या सेलमध्ये ग्राहकांना अत्याधुनिक एसुस लॅपटॉप्ससह त्यांचा डिजिटल अनुभव अपग्रेड करण्याची उत्तम संधी मिळेल. उच्च कार्यक्षमतेचे गेमिंग लॅपटॉप्स आणि आकर्षक प्रॉडक्टिव्हिटी लॅपटॉप्स यांपासून, एसुस आपल्या लोकप्रिय आरओजी, टीओफ, व्हिओबुक आणि झेनबुक सिरीजवर आकर्षक सूट आणि बंडल ऑफर्स देत आहे.ग्राहक आता मर्यादित काळासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एसुस लॅपटॉप्सवर ५३% पर्यंत बचत करू शकतात, ज्यामुळे अत्याधुनिक इनोव्हेशन आणि अतुलनीय कामगिरीमध्ये गुंतवणूक करण्याची ही योग्य वेळ आहे. या मर्यादित कालावधीतील ऑफर्स १७ ऑगस्टपर्यंत रिलायन्स, क्रोमा, आणि विजय सेल्स यांसारख्या नामांकित इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर्सकडे उपलब्ध असतील, ज्यामुळे वापरकर्त्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाकडे अपग्रेड करणे आता पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे.

# अत्याधुनिक स्मार्ट आणि हरित उत्पादन सोल्यूशन्सचे प्रदर्शन

मुंबई – तैवान एक्सलन्स ऑटोमेशन एक्स्पो २०२५ (११-१४ ऑगस्ट, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई)मध्ये २२ पुरस्कार विजेते ब्रँड्स आणि ४४ अग्रणी औद्योगिक सोल्यूशन्सना प्रदर्शित करेल, जे भारताच्या हरित आणि डिजिटल उत्पादन क्रांतीमध्ये तैवानच्या धोरणात्मक भूमिकेला दृढता देईल. 'ग्रीन व्हिजन, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग' (हरित दृष्टिकोन, स्मार्ट उत्पादन) या संकल्पनेअंतर्गत होणाऱ्या या प्रदर्शनात एआय-संचालित ऑटोमेशन, शाश्वत धातूकाम तंत्रज्ञान आणि इंडस्ट्री ४.०-सुसज्ज रोबोटिक्सचा समावेश आहे, ज्याचा भारतातील उद्योगांमध्ये उत्पादकता, ऊर्जा कार्यक्षमता व ईएसजी कामगिरी वाढवण्याचा मनसुबा आहे.

# धोरणात्मक ओईएम भागीदारी केल्याचे जाहीर

मुंबई – भारतात तयार करण्यात आलेल्या इंडस पस्टोअर या अँड्रॉइड प मार्केटप्लेसने आज अल्काटेल या फ्रान्समधील कन्झ्युमर टेक्नोलॉजी ब्रँडसोबत धोरणात्मक ओईएम भागीदारी केल्याचे जाहीर केले. या दीर्घकालीन भागीदारीचा भाग म्हणून भारतातील सर्व अल्काटेल स्मार्टफोनमध्ये इंडस पस्टोअर प्रि-इन्स्टॉल केलेले असेल. लोकलाइझ्ड प मार्केटप्लेस एकत्रित करून दोन्ही ब्रँड देशभरातील लाखो युजरसाठी इनोव्हेशन व क्सेसिबिलिटीला चालना देतील.

# यंदा रक्षाबंधनला काय आहे खास?

रक्षाबंधन फक्त सण नाही तर बहीण-भावामधील अतूट नात्याचे हृदयस्पर्शी साजरीकरण आहे, ज्यामध्ये आठवणी, भावना आणि आजीवन संरक्षण व प्रेम करण्याचे वचन सामावलेले आहे. हा सण जवळ आला असताना एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री त्यांच्या भावांसोबत या सणाला संस्मरणीय करण्यासाठी विशेष योजनांबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाली, ''एकुलती एक मुलगी असल्याने मला मोठे होत असताना रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करावेसे वाटायचे. मी माझ्या मैत्रिणींना त्यांच्या भावांना राखी बांधताना पाहायची आणि मनात वाटायचे की, माझा देखील भाऊ असता तर. मुंबईला आल्यानंतर माझी ती इच्छा पूर्ण झाली, जेथे मी अभिनेते अयाज अहमद यांना भेटले.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५३५/२०२५

पुढील तारीख २३/०९/२०२५

अर्जदार : १) सुरेखा यशवंत उर्फ योसेफ उबाळे, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम रा. फुलेनगर, खंडोबा मंदिराजवळ, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) सुशांत यशवंत उर्फ योसेफ उबाळे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. फुलेनगर, खंडोवा मंदिराजवळ, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) प्रशांत यशवंत उर्फ योसेफ उबाळे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. फुलेनगर, खंडोबा मंदिराजवळ, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) प्रमोद यशवंत उर्फ योसेफ उबाळे, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. फुलेनगर, खंडोबा मंदिराजवळ, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) सुषमा अनिल आल्हाट वय ३९ वर्षे धंदा घरकाम रा जोगेश्वरी ता गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर ६) मनिषा पि. यशवंत उर्फ योसेफ उबाळे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. वरखेड ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त बिषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने मख्खे भाऊ असून अर्जदार क्र.५ व ६ या त्यांच्या बहिणी आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ६ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडील नामे योसेफ उर्फ यशवंत भाऊराव उबाळे हे मोजें गंगापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १६/०४/२०१३ रोजी गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत योसेफ यांना यशवंत नावाने देखील ओळखले जात होते. चाणे प्रमाणे मयत योसेफ उर्फ यशवंत भाऊराव उबाळे यांना अर्जदार क्र.१ ते ६ हे वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येले की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काळी आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप –उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ६/८/२०२५ रोजी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी सौ. मिना भ्र. भाउसाहेब प्रधान, रा. वरवंडी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांचेकडुन खालिल परिशिष्ठामधील नमुद शेत जमीन विकत घेण्याचा लेखी करारनामा केला असुन त्यांनी नमुद मिळकत ही त्यांच्या एकमेव मालकीची व ताब्यातील असुन त्यावर कसल्याही प्रकारचे सरकारी अथवा खाजगी कर्ज नाही अशी हमी माझ्या पक्षकारास दिली आहे. त्यांनी माझ्या पक्षकाराच्या हक्कात लिहुन दिलेल्या करारनाम्यानुसार खरेदीखतासाठी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता त्यांनी केलेली आहे. यापुर्वी दिनांक १४/०३/२०२५ रोजी या वर्तमानपत्रात सदर व्यवहाराबाबत जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले होते त्यास कुणीही आक्षेप घेतलेला नाही असे असतांनीही सावधानता म्हणुन पुन्हा एकदा जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी नमुद मिळकती बाबत इतर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप माझ्या कार्यालयात नोंदवावा अन्यथा माझे पक्षकार विक्री करारनाम्यानुसार पुढील व्यवहार पुर्ण करतील.

मिळकतीचे परिशिष्ठः- शेत जमीन गट क्र.८४ मौजे राजुरा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर पैकी क्षेत्र ०१ हेक्टर ७८ आर ज्याची चतुसिमा पुर्वेसः सुनिता दत्ता पादर व भागवत दत्ता पादर यांची शेत जमीन, पश्चिमेसः संजय पादर व शुभम पादर यांची शेत जमीन, उत्तरेसः-कैलास बालचंद वैदय व नवनाथ बालचंद वैदय यांची शेत जमीन, दक्षिणेस: कांतीलाल रामराव म्हस्के व संगीता म्हस्के यांची शेत जमीन

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहिर प्रगटन प्रसिध्द करणार**

**ॲड. एस. के. नरोडे पाटील राधेशाम निवास, हॉटेल धनराजच्या पाठीमागे, लक्ष्मी कॉलणी, गंगापुर, ता. गंगापुर, नि. छत्रपती संभाजीनगर मो. नं. ९०११९५५५९०**

---

# सरुचा मंत्रमुग्ध करणारे राजस्थानी कठपुतळी नृत्य

झी टीव्हीवरील 'सरू' ही मालिका सध्या उच्च दर्जाच्या नाट्यमय घडामोडींमुळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. अनिका (अनुष्का मर्चंडे) ही वेद (शगुन पांडे) याच्याशी साखरपुडा करण्यासाठी सतत योजना रचत आहे. या सगळ्या गोंधळात सरू (मोहक मटकर) ही साखरपुडा थांबवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावत आहे. तिच्या डोळ्यांतून व्यक्त होणारी भावनात्मक ताकद, नाजूक अभिनय आणि तेजस्वी उपस्थिती यामुळे मोहक मटकरने प्रेक्षकांच्या मनावर एक विशेष ठसा उमटवला आहे. तिच्या व्यक्तिरेखेला खरीखुरी खोली आणि भावनिक वजन मिळाले आहे.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५३२/२०२५

पुढील तारीख २३/०९/२०२५

अर्जदार : सुरेखा यशवंत उबाळे, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम रा. फुलेनगर, खंडोबा मंदिराजवळ, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गर अर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. था ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही वरील नमुद पत्यावरील कायमची रहिवाशी असून अर्जदाराची मुलगी नामे सविता यशवंत उबाळे ही मौजे गंगापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी नानी नी दिनांक ०८/०६/२०२४ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेली आहे मृत्युसमयी मयत सविता यशवंत उबाळे या अविवाहीत होत्या. मयत सविता यशवंत उबाळे यांना अर्जदार हीच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस वाह्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत में प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्वीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ६/८/२०२५ रोजी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. ए. शेख, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्र. ५२५/२०२५

प्रकरणात पुढील तारीख २९/०९/२०२५

अर्जदार :१) मरयामबी भ्र. मुश्ताक शेख वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. मन्सुरी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) अहेमद पिता जानमोहम्मद शेख वय ४० वर्षे, धंदा मजूरी रा. मन्सुरी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) मुजीबमियाँ पिता जान मोहमद शेख वय ३७ वर्षे, धंदा मजूरी रा. मन्सुरी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) मेहराज भ्र. मन्सूर मणियार वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. मंगळवार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे

// विरूध्द //

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण : भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबाबत अर्ज.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणार असून अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांची यांचे वडील नामे शेख जान मोहमद शेख करीम दिनांक १०/०३/२०२२ रोजी वृध्दपकाळाने राहत्या घरी मन्सुर कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ४ यांची आई नामे नुरजहा जानमोहम्मद शेख या दिनांक ३१/१०/२०१७ रोजी वृध्दपकळाने राहत्या घरी मौजे मन्सुरी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयतास अर्जदार क्रं. १ व ४ ह्या विवाहीत मुली असून अर्जदार क्रं. २ व ३ हे मुले आहेत आणि अर्जदार क्रं. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ व विवाहीत बहिणी आहे. अर्जदारांचे वडील मयत शेख जान मोहमद शेख करीम हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मध्ये गंगापूर आगारातचालक (ड्रायव्हर) म्हणून नोकरीस होते. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे कोषागार कार्यालय, औरंगाबाद येथील झझज छे. छत्रऱ-णठ०००२५०९९ मध्ये जमा असलेली पेन्शन, जी.पी.एफ. इत्यादीची संपूर्ण रक्कमखात्यात रक्कम रूपये १,६१,३००/- (अक्षरी एक लाख एकसष्ठ हजार तीनशे रूपये मात्र) आहे जमा असून सदरील व्याजास रक्कमेची अर्जदार क्र. १ ते ४ यांनी संबंधीत अधिकारी यांना मागणी केली असता त्यांनी मयत शेख जान मोहमद शेख करीम यांचे वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केलेली असल्यामुळे सदर अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक ०६/०८/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**(गट नं. ८६/पार्ट, प्लॉट नं. ६४, एकुण ११६० चौ. फुट, मी. नं. ६४८६ मौजे देवळाई, ता.जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद))**

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार शोयब कदीर देशमुख, रा. सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना बबन फत्तु जाधव रा. सिंदोन ता. जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी त्यांच्या मालकीची मिळकत मौजे देवळाई ता.जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा हद्दीतील गट नं. ८६ मधील गंगोत्रीनगरचा प्लॉट नं. ६४ ज्याचे क्षेत्रफळ २९ बाय ४० म्हणजे ११६० चौ. फुट ज्याचे चौ. मी. १०७.८० होतात ही कायमस्वरुपी विक्री करण्याचा निर्णय केला आहे.

सदरील प्लॉट नं. ६४ ची चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : १५ फुटाचा रोड

पश्चिमेस : प्लॉट नं. ६३,

दक्षिणेस : प्लॉट नं. ६५

: गट नं. ८६ पार्ट उत्तरेस

तरी सदरील प्लॉट मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असुन दोषमुक्त आहे व कसल्याही प्रकारची कोणाचाही हितसंबंध नाही. असे कळविलेले आहे. येणेप्रमाणे सदर प्लॉट मिळकतीबाबत किंवा कसल्याही प्रकारचा कोणाचाही आक्षेप/उजर, हितसंबंध असेल किंवा कोणत्याही प्रकारचे व्यवहार किंवा करार, विक्री, दान, गहाण, तारण, लिज, बांध, चर्तुसिमा, सिमा हद्दी, चोळी- बागडी इत्यादी असल्यास किंवा कोणत्याही कारणाने आक्षेप असल्यास मिळकतीशी किंवा व्यवहाराशी असलेले हितसंबंध /आक्षेप खालील दिलेल्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (८) दिवसाच्या आत आपले आक्षेप/उजर नोंदवावा. सदरील मुदतीत कोणताही आक्षेप / उजर न आल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्विवाद व दोषमुक्त व वरील उल्लेखित मालक व्यतिरिक्त कोणताही मालकी हक्क नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर कोणताही उजर /आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

दिनांक : ०४/०८/२०२५

ठिकाण : सोयगांव

ॲड. योगेश आर जावळे

कार्यालय : सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद,

मो. ९४०३२५१७४६/९८९०५९०३४७

## अग्रलेख...

# अमेरिकेची डबल ढोलकी

आंतरराष्ट्रीय कूटनीतीमध्ये असे काही क्षण येतातच जेव्हा एखाद्या राष्ट्राला स्पष्ट रेषा आखून म्हणावे लागते - पुरे झाले...! आता आमचे आम्ही पाहून घेऊ!! भारतासाठी तो क्षण आला आहे आणि त्या क्षणी जसे वागले पाहिजे, तसेच भारत वागला आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर मोठ्या प्रमाणात कर वाढवण्याच्या धमक्या दिल्या आणि कारण सांगितले की, भारताने रशियाकडून तेलाची आयात केली आहे आणि तो इतर देशांना हे तेल विकून नफादेखील कमावत आहे. हा आरोप म्हणजे अमेरिकेचे ढोंग आहे आणि ते भारताने उघडे पाडले आहे- पुराव्यासकट. युक्रेनमध्ये लोकांचे जीव जात असताना भारत रशियाकडून तेलाची आयात करीत असल्याचे सांगून भारताला खलनायकी प्रतिमेत अडकविण्याचा ट्रम्प यांचा डाव होता. तो त्यांच्याच अंगलट आला आहे. आकडेवारी जी कहाणी सांगते ती लक्षात घेतली पाहिजे. युद्धापूर्वी, रशियाचे तेल भारताच्या आयातीत जेमतेम २.५ टक्के होते. २०२३ पर्यंत हा आकडा जवळजवळ ३९ टक्क्यांपर्यंत वाढला आणि रशिया भारताचा मोठा पुरवठादार बनला. २०२४ मध्ये युरोपियन युनियन आणि रशिया यांच्यातील व्यापार हा भारत आणि रशिया यांच्यातील व्यापाराच्या तुलनेत तब्बल चौपट होता. युरोपही तेव्हा रशियाकडून तेल विकत घेतल्याबद्दल भारताला दोष देत होता. अमेरिकेचेही तेच. अमेरिका आपल्या अणुउद्योगासाठी रशियाकडून युरेनियम हेक्साफ्लोराईड, ईव्ही बॅटरीसाठी पॅलेडियम आणि विविध रसायने आणि खते आयात करीत असतो. मोती, मौल्यवान रस्ते, धातू, आयसोटोप्स, लाकूड व लाकडी फर्निचर, विमाने व सुटे भाग, पोलाद, तेलबिया, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे, भाज्या इत्यादी अनेक वस्तू अमेरिका हा देश रशियाकडून आयात करतो. अमेरिकेसाठी रशियाकडून ही आयात केली जाते तेव्हा युक्रेनची ताकद कमी होत नाही आणि रशियाच्या युद्धखोरीला बळ मिळत नाही. भारताने काहीही केले तरी युक्रेनवर अन्याय होतो. अमेरिका स्वतःच्या पुरवठा साखळ्यांवर कधीही ताण येऊ देत नाही. परंतु जेव्हा १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारत पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी परवडणारे कच्चे तेल विकत घेतो तेव्हा त्याच्यावर नफाखोरीचा आरोप अमेरिकेला करावासा वाटतो, यातच त्याचे ढोंग स्पष्ट होते. अमेरिकेची ही डबल ढोलकी भारताने उघडी पाडली आहे की, त्याबद्दल अधिक काही सांगण्याची गरजच नाही. यासंदर्भात एक साधा प्रश्न आहे की, अमेरिकेला त्यांचे नागरिक, तेथील उद्योग, तेथील रोजगार यांचे संरक्षण करण्याचा अधिकार असेल तर भारताने स्वतःच्या हितासाठी अशी आयात केली तर अमेरिकेच्या पोटात दुखण्याचे कारण काय? संपूर्ण जगाला नैतिकतेची शिकवण द्यायची आणि दुसरीकडे सतत अनैतिक वागायचे हे अमेरिकेचे जुनेच धोरण आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांत मात्र अशाप्रकारचा विचार करून सोबत किंवा विरोध करता येत नाही. त्यामुळे भारताकडून अमेरिकेशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सतत होत आला. तरीही भारताला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यासाठी अमेरिका आसुसलेला असेल तर त्याचे मूळ अमेरिकेच्या हुकूमशाही स्वभावात आहे. आम्ही म्हणू तो लोकतांत्रिक आणि आम्ही सांगू तो हुकूमशहा, अशाच पद्धतीने अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारण चालत आले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या त्याच परंपरेचा भाग आहेत. निर्बंध लादणे, आरोप करणे, शुल्क वाढविणे असे सारे अमेरिका सतत करीत असतो. ते त्या देशाने यापूर्वी चीनसोबत करून पाहिले. पण, चीन आणि भारत यांच्या अर्थव्यवस्थेत फरक आहे. ट्रम्प यांनी म्हटले म्हणून भारताची अर्थव्यवस्था मृतप्राय नाही. ती जिवंत, गतिशील आणि वर्धिष्णू अर्थव्यवस्था आहे. चीनची अर्थव्यवस्था सरकारकेंद्रित व सरकारच्या हुकूमावर चालणारी आहे. त्यामुळे तिकडे सरकारची गचांडी पकडली की उद्योगविश्व लायनीवर येते. तसे भारतात घडत नाही. घडणार नाही. याचे कारण भारतात औद्योगिक विश्वातदेखील लोकतांत्रिक व्यवस्था आहे. मोठ्या प्रमाणात वैविध्य आहे. सरकारवरील अवलंबित्व मर्यादित आहे. भारताची स्वतःचीच बाजारपेठ एवढी मोठी आहे की, त्याने ठरविले तर तो स्वबळावर उत्पादन व उपभोग दोन्हींचे व्यवस्थापन करू शकतो. परंतु, नव्या जागतिक व्यवस्थेत अर्थव्यवस्था एककल्ली किंवा देशकेंद्रित करून चालत नाही. त्यामुळे भारत संयमाने वाटचाल करीत असतो.

भारतीय वस्तूंवर वाढीव शुल्क लादण्याचा अमेरिकेचा पवित्रा हा एकप्रकारे अस्तित्वातच नसलेल्या समस्येचे भांडवल करून भारतीय अर्थकारणाला धक्का पोहोचविण्याचा डाव आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे रत्ने, दागिने, औषधी, वस्त्रोद्योग व आयटी सेवा यासारख्या क्षेत्रांना धक्का बसणार हे उघड आहे. पण, याउलट विचार केला तर भारत देखील अनेक वस्तू अमेरिकेकडून आयात करतो. अमेरिकेतील कंपन्यांच्या नजरेत भारत ही उत्तम क्रयशक्ती असलेली मोठी बाजारपेठ आहे. ट्रम्प यांच्यासारखीच पावले भारताने उचलली तर अमेरिकन उद्योगांचे काय होईल, याची कल्पना ट्रम्प यांना अद्याप आली नसावी. आधीच डॉलरचे आंतरराष्ट्रीय वर्चस्व कमी करण्यासाठी जगातील अनेक देशांनी कंबर कसलेली आहे. ब्रिक्स राष्ट्रे पर्यायी पेमेंट सिस्टमबद्दल उघडपणे बोलू लागली आहेत. पुरवठा साखळीचे वैविध्यीकरण हाही परवलीचा विषय बनलेला आहे. अशात भारतासारख्या महाकाय देशाला टार्गेट करणे ही ट्रम्प यांची मोठी चूक ठरणार आहे. खरे तर हा विषय डॉलरला पर्याय उभा करण्याच्या प्रयत्नांशीच संबंधित आहे. रशियाकडून तेल घेतले, ते विकले, नफा कमावला ही सारी अमेरिकेची बतावणी आहे. सर्वाधिक उपभोग, सर्वाधिक कार्बन उत्सर्जन, सर्वाधिक प्रदूषण यासाठी अमेरिका कुख्यात आहे. जोपर्यंत इतर देश अमेरिकेच्या धोरणाशी किंवा लहरींशी जुळवून घेतात, तोपर्यंत ते मित्र असतात. त्यापेक्षा वेगळे वागणारा देश लगेच शत्रूंच्या यादीत जातो. जगातील सर्वांत जुनी लोकशाही आणि सर्वांत मोठी लोकशाही हे अमेरिका आणि भारत या दोन देशांचे महत्त्व आहे. हे दोन देश एकत्र राहिले तर चीन किंवा रशिया यांच्याकडून जागतिक अर्थकारणाचा बचाव करण्याचे अर्धे काम आपसूकच होऊन जाते. अमेरिकेच्या लहरीपणामुळे भारताला आरसा दाखवण्याची भूमिका घ्यावी लागली. अमेरिकेने हे लक्षात ठेवले पाहिजे की, भारताची अर्थव्यवस्था आता दोन दशकांपूर्वी होती तेवढी निर्यातीवर अवलंबून राहिलेली नाही. देशांतर्गत बाजारपेठ वेगाने वाढली आहे. जगातील पर्यायी बाजारपेठा भारतासाठी आज पूर्वीपेक्षा जास्त सुलभ आहेत. भारत आता तसा अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अमेरिकेवर फारसा अवलंबून नाही. तरीही स्वायत्त राष्ट्र म्हणून एक भूमिका घेतल्याबद्दल भारताला दंडित करण्याची धमकी देण्याची आगळिक अमेरिकेने केलेली आहे. भारत आज टॅरिफच्या दबावामुळे झुकला तर अमेरिका हा मुद्दा दीर्घकाळ वापरेल. भविष्यातील कोणत्याही व्यापारी भागीदाराला नाव ठेवण्यासाठी अमेरिका हा मुद्दा वापरू शकेल. त्यामुळेच स्वतःच्या भूमिकेबद्दल ठाम राहण्याची भूमिका भारताने घेतली, हे योग्यच. यातला दुसरा मुद्दा असा की, व्यापारी वादांच्या स्थितीत सॉफ्ट पॉवरची भूमिका दुर्लक्षित केली जाते. सॉफ्ट पॉवर म्हणून भारताची जागतिक प्रतिमा फारच उज्ज्वल आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही, संस्कृती, तंत्रज्ञान आणि बौद्धिक भांडवलाचे केंद्र म्हणून भारताला मिळणारी सद्भावना अमेरिकेहून फार मोठी आहे. संगीत, चित्रपट, योग, पाककला, क्रिकेट, संशोधन, आयटी यासह बुद्धिबळासारख्या खेळात भारतीय क्रीडापटूंनी दाखविलेले कौशल्य जगाला भुरळ पाडणारे आहे. शिवाय, आंतरराष्ट्रीय वाटाघाटीत भारताचे एक सूत्र आहेः परस्पर आदर, परस्पर हित, परस्पर संवेदनशीलता. या सूत्रावर भारत भागीदारी करतो. तशी भागीदारी अमेरिका करीत नाही. भारत ते करतो म्हणून अमेरिकेचा त्रागा सुरू झालाय. अमेरिकेला भारताशी मैत्री कायम ठेवायची असेल तर त्याला समान दर्जा देण्याची दिलदारी दाखविली पाहिजे. भारताला प्यादा म्हणून वापरायचे असे अमेरिकेने ठरविले असेल तर ते कधीही शक्य होणार नाही. ट्रम्प यांनी कितीही डबल ढोलकी वाजविली तरी त्याचा काहीही फायदा होणार नाही. ▮

## विशेष

# क्रीडा क्रांतीची पहाट

**प्रा. सुखदेव बखळे**

ज्या दिवशी भारतीय शिष्टमंडळाने २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी तयारी करण्यासाठी लॉसने येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) च्या अधिकाऱ्यांची भेट घेतली, त्याच दिवशी मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरणाला मान्यता दिली. त्याचा उद्देश २०३६ च्या खेळांसाठी भारतीय क्रीडा परिसंस्था तयार करणे हा आहे. हे धोरण प्रमुख क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून भारताला क्रीडा पर्यटन स्थळ बनवण्यावर लक्ष केंद्रित करते. देशाच्या क्रीडा परिदृश्याला आकार देण्यासाठी आणि क्रीडा माध्यमातून भारतीयांना सक्षम करण्यासाठी हा एक ऐतिहासिक उपक्रम आहे. नवीन क्रीडा धोरण सध्याचे राष्ट्रीय क्रीडा धोरण, २००१ ची जागा घेईल. हे धोरण भारताला जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून स्थापित करण्यासाठी आणि २०३६ च्या ऑलिम्पिक खेळांसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये मजबूत दावेदार म्हणून स्थापित करण्यासाठी एक धोरणात्मक रोडमॅपच आहे. खेळाडूंना प्रशिक्षण आणि समर्थन देण्यासाठी जागतिक दर्जाची प्रणाली तयार करणे, राष्ट्रीय क्रीडा महासंघांची क्षमता आणि व्यवस्थापन वाढवणे, क्रीडा कामगिरी वाढवण्यासाठी क्रीडा विज्ञान, औषध आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहायक कर्मचाऱ्यांसह क्रीडा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि विकसित करणे आदी उपक्रमांचा या धोरणात समावेश आहे. हे धोरण क्रीडा क्षेत्रातील आर्थिक क्षमतेवर भर देते आणि त्याचे उद्दिष्ट क्रीडा पर्यटनाला चालना देणे आणि भारतात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे हे आहे.

सार्वजनिक-खाजगी भागीदारी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी आणि नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा उपक्रमांद्वारे खाजगी क्षेत्राच्या सहभागाला या धोरणात प्रोत्साहन देण्यात आले आहे. नवीन क्रीडा धोरण सामाजिक समावेशाला चालना देण्यासाठी खेळांच्या भूमिकेवर भर देणारे आहे. त्याचप्रमाणे विविध क्रीडा कार्यक्रमांद्वारे महिला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, आदिवासी समुदाय आणि दिव्यांग व्यक्तींचा सहभाग वाढवण्यावर विशेष भर देणारे आहे. स्थानिक आणि पारंपरिक खेळांचे पुनरुज्जीवन आणि त्याला प्रोत्साहन देण्यावर या धोरणात भर आहे. खेळांना एक व्यवहार्य करीअर पर्याय म्हणून स्थापित करण्याबरोबच भारतीय समुदायाला क्रीडाविश्वात सामावून घेण्याचा उद्देश आहे. खेळाला राष्ट्रीय चळवळ बनवणे हे या क्रीडा धोरणाचे आणखी एक उद्दिष्ट आहे. देशव्यापी मोहिमा आणि समुदायआधारित कार्यक्रमांद्वारे खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आणि फिटनेसबाबत जनजागृती करणे, शाळा, महाविद्यालये आणि कामाच्या ठिकाणी फिटनेसबबात निर्देशांक सादर करणे, क्रीडा सुविधांची सार्वत्रिक उपलब्धता वाढवण्यावर मेहनत घेणेही त्यात अपेक्षित आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नव्या धोरणात काही प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत. शालेय अभ्यासक्रमात खेळांचा समावेश करणे. क्रीडा शिक्षण आणि जागरूकता वाढवण्यासाठी शिक्षक आणि शारीरिक शिक्षण शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देणे, यावर भर देण्यात आला आहे. नव्या क्रीडा धोरणातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कायदेशीर चौकटीसह क्रीडा प्रशासनासाठी एक मजबूत नियामक चौकट स्थापित करण्यात येणार आहे. खाजगी क्षेत्र निधी आणि समर्थन (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अशा नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणा विकसित करून 'पीपीपी' आणि 'सीएसआर'द्वारे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात येणार आहे. कामगिरीचा मागोवा घेण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि कार्यक्रम अंमलबजावणीसाठी 'एआय' आणि डेटा विश्लेषणासह अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर अधिक भर देण्यात येणार आहे. एनएसपी २०२५ मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एक मॉडेल म्हणून काम करणार आहे. ऑलिम्पिकमध्ये भारतीय क्रीडापटूंची कामगिरी हळहळू सुधारत आहे. क्रीडा जगतातील या सगळ्यात मोठ्या स्पोर्टिंग इव्हेंटमध्ये भारतीय क्रीडापटू पदक जिंकण्यात यशस्वी ठरू लागले आहेत. मूलभूत सोयी-सुविधांची कमतरता असूनही केवळ गुणवत्तेच्या जोरावर भारतीय क्रीडापटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान अभिमानाने उंचावली आहे. आता भारताच्या नव्या क्रीडा धोरणाची जोड क्रीडापटूंना मिळणार आहे.

या धोरणामध्ये तळागाळातील क्रीडापटूंना पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यावर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे क्रीडापटूंना आर्थिक पाठबळ देण्याचा मानसही आहे. क्रीडाक्षेत्रात मागील काही वर्षांमध्ये भारताने देदीप्यमान कामगिरी केली आहे. प्रतिकूल परिस्थितीत खेळाडूंनी धडे गिरवले आणि भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजवले. भारताने क्रिकेटशिवाय इतर खेळांमध्येही आंतरराष्ट्रीय पातळीवर झेंडा रोवला आहे. असे असताना भारताला क्रीडाक्षेत्रात आणखी भक्कमपणे पाय रोवण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलले आहे. नव्या क्रीडा धोरणात तळागाळातील क्रीडा स्पर्धांना भक्कम अधार देण्याचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून खेळाडूंची पारख केली जाणार आहे. तसेच त्यांना भविष्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. नव्या क्रीडा धोरणानुसार, ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधा अजून अत्याधुनिक करण्याचा मानस आहे. यामुळे खेळाडूंना स्थानिक पातळीवरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. नवीन क्रीडा धोरणांतर्गत खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी क्रीडा विज्ञान आणि औषधांवर विशेष भर दिला जाईल. प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहायक कर्मचाऱ्यांनाही चांगले शिक्षण दिले जाणार आहे.

नवीन क्रीडा धोरणानुसार भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. या स्पर्धांमुळे भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढेल. तसेच भारतीयांमध्ये खेळाप्रती रुची आणि आदर वाढेल. शाळांमध्येही खेळांचे महत्त्व आणखी वाढवले जाणार आहे. मुलांना शालेय जीवनापासूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर करीअर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात क्रीडा सुविधा पुरवल्या जातील. खेळांना राष्ट्रीय चळवळ बनवण्याचा मुख्य उद्देश या धोरणामागे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सक्षम पायाभूत सुविधा खेळाडूंच्या यशासाठी आवश्यक असतात. 'खेलो भारत नीती २०२५'अंतर्गत खेळाडूंची निवड आणि प्रगतीसाठी अत्याधुनिक डेटा विश्लेषण आणि क्रीडा विज्ञानाचा वापर केला जाईल. देशभरातून प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्यासाठी 'प्रतिभा ओळख कार्यक्रम' राबवला जाईल. त्यामुळे दुखापतींचे व्यवस्थापन, खेळाडूंचे मानसिक आरोग्य सांभाळणे आणि त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ शक्य होईल. क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या शहरांपुरता मर्यादित राहणार नाही. तळागाळापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत सर्वसमावेशक आणि सुलभ क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करण्याचे ध्येय आहे. त्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे जागतिक दर्जाची प्रशिक्षण केंद्रे व क्रीडांगणे उभारली जातील. त्यामुळे स्थानिक प्रतिभेला वाव मिळेल. दिव्यांग खेळाडूंच्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'पॅरा स्पोर्ट्स'ला विशेष साहाय्य दिले जाणार आहे. भारताचा सांस्कृतिक वारसा आणि क्रीडा कौशल्ये जागतिक स्तरावर नेणे हे या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. याखेरीज शाळेच्या अभ्यासक्रमात एक प्रमुख विषय म्हणून खेळ समाविष्ट केले जातील आणि लहानपणापासून क्रीडा साक्षरता रुजवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. या सर्व प्रयत्नांमधून देश क्रीडाक्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याला गवसणी घालणार आहे. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# छंद माझा वेगळा...

छंदातून ज्ञानवृद्धी होते. छंद माणसाला नवनवीन शिकायला देते. म्हणजेच काय तर छंद माणसाला जगायला शिकविते. पण छंद जोपासताना काही गोष्टींची पथ्ये पाळली जाणे गरजेचे आहे. आपल्या छंदाच्या नावाखाली होणारा अतिरेक बरेचदा अनेकांसाठी मनस्ताप ठरतो. त्रास होतो, पण बरेचदा बोलले जात नाही आणि मग छंदाच्या नावाखाली अवडंबर होतो. आज छंदाचा 'छांदिष्टवाडा' झाला आहे, असे म्हटले जाऊ शकते.

छंद या विषयावर लिहिण्याचे कारण एवढ्यासाठीच की, चार दिवसांपूर्वी एक प्रकार जिल्ह्यात उघडकीस आला आणि सर्वच अवाक् झाले. मी शासकीय अधिकारी आहे. माझ्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शासकीय वास्तूत मी काहीही करू शकतो, असा समज करून कदाचित जोपासलेला छंद आज एका अधिकाऱ्यासाठी चर्चेचा विषय झाला आहे. छंदातून ज्ञानवृत्ती होते. नवीन गोष्टी शिकायला मिळतात. सर्जनशीलता छंद जोपासण्यातून वाढते. सामाजिक संबंध वृद्धिंगत होण्यास छंदच पोषक ठरतात. स्वतःच्या आनंदासाठी नियमित करायला आवडणारे काम म्हणून छंदाची साधी सोपी व्याख्या केली जाऊ शकते. पण यासाठी काही बंधनंसुद्धा आहेत. छंद जोपासताना पुरेसा वेळ असणे, हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आता ज्या महाशयांच्या निमित्ताने छंद प्रपंच लिहावासा वाटला, ते एका प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यांनी केलं काय तर, आरोग्य केंद्र परिसरात कुक्कटपालन सुरू केलं. कोंबड्या पाळल्या, अंडी उबवण केंद्र उभारलं आणि हाच त्या महाशयांचा छंद आहे. आता मान्यच आहे, त्यांना यातून आनंद मिळत असेल. पण छंद जोपासण्यासाठी पुरेसा वेळ असावा, या नियमाचे काय? आरोग्य क्षेत्रात काम करताना कायम सतर्क राहावे लागणाऱ्या या महाशयांना कोंबड्या पाळायला वेळ मिळत असेल तर रुग्णांची सेवा ते कधी करीत असावे? हा प्रश्नच आहे. कोंबड्यांचे संगोपन आणि रुग्णांकडे दुर्लक्ष हे वेगळे सांगण्याची गरज नाही. हा माझा छंद आहे, असे ते ठामपणे सांगतात. पण छंद जोपासायचा कुठे? याचे तारतम्य त्यांना आहे का? हा प्रश्न या निमित्ताने होतो. कोंबड्यांमुळे पसरणारी अस्वच्छता रुग्णांच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा ठरणार नाही, याची खात्री कोण देणार?



कोरोनापासून हा उपद्व्याप सुरू होता, जो आज उघड झाला. मग त्यांच्या वरिष्ठांना याची माहिती का नसावी? हेही मोठे कोडेच आहे. माहिती नसेल तर इतके वर्षांत त्यांनी कधीच या रुग्णालयाला भेट दिली नाही का? हाही प्रश्न निर्माण होते. असे नसेल तर या छंदात वरिष्ठांनाही आनंद मिळतो, असे म्हणायचे का? कुणाचे दुर्लक्ष, पाठिंबा कुणाचा हा विषय वेगळा ठेवला तरी खरंच शासकीय वास्तूत हे करण्याची परवानगी आहे का? प्रशासकीय व्यवस्थेच्या नियमावलीत हे सर्व बसते का? याचा विचार होणे गरजेचे आहे. या महाशयांचा हा छंद आज उजागर झाला म्हणून पण असे अनेक जण असतील जे आपले अनेक छंद जोपासत असतील, ज्याचे दुष्परिणाम प्रशासकीय यंत्रणेला भोगावे लागतात. अशांवर कदाचित कारवाई होईलही, पण कारवाईने मानसिकता बदलेल का हा प्रश्न आहे. जोपर्यंत मी करीत असलेले काम म्हणजे माझे कर्तव्य आहे. याची जाणीव होणार नाही, तोपर्यंत असे विचित्र छंद जोपासण्याची वृत्ती संपणार नाही? छंद जोपासलेच पाहिजे, पण ते सकारात्मक आणि तेही वास्तविकतेचा सारासार विचार करूनच! नाही तर छंद माझा वेगळा म्हणतात, कधी हेच छंद अंगलट येतील याचा नेम नाही? विशेषकरून प्रशासकीय व्यवस्थेत वावरताना हे पथ्य पाळलेच गेले पाहिजे.

आज प्रचंड मोठ्या आवाजात गाणे वाजवत रस्त्याने मिरवणुका काढण्याचाही लोकांना छंदच जडला आहे. आपल्या छंदामुळे कुणाला त्रास होतो, याचा विचार करण्याची क्षमता लोप पावली आहे. नियम आहेत. पण छंदापुढे नियमांचा विसर पडतो. छंद आनंद देतात, जीवनात सकारात्मकता आणतात, असे म्हणतात; मात्र अशा कृतींमधून केवळ तिरस्कार आणि द्वेषभावच निर्माण होऊ शकतो. छंदाला आपल्यापुरतेच मर्यादित ठेवा. ते इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका. जेव्हा ही मानसिकता आमची होईल, तेव्हा शासकीय रुग्णालय परिसरात कोंबड्यांचे संगोपन करण्याची हिंमत होणार नाही! ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्री गीता : कर्मयोग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा तिसरा अध्याय कर्मयोग म्हणून परिचित आहे. या अध्यायात अर्जुन अधिकच गोंधळून गेला आहे. दुसऱ्या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने संसार हे दुःखाचे मूळ असून त्यातून निवृत्तीचा सल्ला दिला आहे. ज्ञान हेच आत्मतत्त्वासाठी महत्त्वाचे असून मुक्तीसाठीचे ते सर्वयोग्य साधन म्हटले आहे. हे ऐकल्यानंतर अर्जुन बऱ्यापैकी ज्ञानगूढ गम्य झाला असताना भगवंत म्हणतात

**'तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः'**

म्हणजे ज्ञानाच्या गाडीत बसण्याची तयारी सुरू असताना भगवंत म्हणतात, 'ऊठ! कर्म कर!' बरं! करावयाचे कर्म काही भोजन कर, अंघोळ कर, देवपूजा कर! असे नव्हते तर भगवान सांगतात 'युद्ध कर, तेही आप्तस्वकीयांशी!'

महाभयंकर कर्म; ज्यातून रक्तपात, कुलसंहार, महापाप ज्यायोगे नरकप्राप्तीचीच शक्यता अधिक आहे. अशा स्थितीत भगवंतांनी त्याला ज्ञान मार्गावर जाऊ द्यायला हवे होते, पण भगवंत त्याला 'कर्म कर' म्हणतात!

अर्जुन पार गोंधळून गेला आणि भगवंताला म्हणतो-

**'व्यामिश्रेणेव वाक्येन, बुद्धिम् मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयो हमाप्नुयाम् ।'**

भगवंता! परस्पर विरोधी विचारांनी तू माझ्या बुद्धीला मोहित करीत आहेस. कोणता तरी एक ठाम मार्ग मला सांग!

**'लोकेस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥'**

येथे भगवान त्याच्या शंकेचे निरसन करताना अर्जुनाला 'अनघ' म्हणतात. अनघ म्हणजे निर्मळ, निष्पाप, शुद्ध मनाचा. कारण अर्जुन पूर्ण समर्पित भावाने आपला झालेला गोंधळ मांडतात. म्हणून भगवंतही त्याला अनघ म्हणतात आणि विशद करतात की, अर्जुना, मी ज्ञानियांसाठी ज्ञानयोग आणि योगियांसाठी कर्मयोग सांगितला असून ते परस्परांना पूरक आहेत. पण मनुष्यमात्रात दोन प्रकारचे कर्ममार्गी आहेत. अधिकांश लोक कामना मनात ठेवून कर्म करतात. त्यांना कर्मफळाची कामना असते. काही मात्र कर्मफळाच्या उपभोगातून बाहेर पडून ब्रह्मजिज्ञासू बनतात. कर्मत्याग आणि कर्मशून्यता यामधील सम्यक मार्ग जिवासाठी मार्गसोपान असेल. कर्म तर करावेच लागते. कर्मत्यागाने मानवी उत्कर्ष होणे कठीण आहे. त्यासाठी कर्मयोगाचे अनुष्ठानच नैष्कर्म स्थितीपर्यंत नेते.

**'जे धावतया कर्माची लाणी, नैष्कर्म्य**
**बोधाची खाणी! जे भूकेलिया धनी, साधनाची!!'**

खरं तर आपण एक क्षणही कर्म केल्याशिवाय जगू शकत नाही. कारण आपण आपल्या निसर्गदत्त गुणांमुळे अगतिक आहोत. कर्मासाठी हतबलही आहोत.

**'नियतं कुरु कर्म त्वं,कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥'**

कर्म न केल्याने आपला शरीर व्यवहार शक्य नाही त्यामुळे कर्म न करण्यापेक्षा केव्हाही कर्म करणे निश्चित चांगले. पण हे कर्म करताना आसक्ती सोडून सतत कर्तव्यकर्म केले पाहिजे. तरच आपण परमात्म स्वरूप प्राप्त करू शकतो. यासाठी भगवान स्वत:चेच उदाहरण देतात.

**'न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिशू लोकेशू किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥'**

हे अर्जुन! जरी मला तिन्ही लोकात काहीही कर्तव्य नाही तसेच मला प्राप्त करण्यायोग्य कोणतीही वस्तू नाही तरीही मी निरंतर कर्म करीतच असतो. त्यातून भगवान कर्ममार्गाचे महत्त्व सांगतात. ते अर्जुनाला महत्त्वाचे तत्त्व सांगतात की, आपण करीत असलेली सर्व कर्मे प्रकृतीच्या गुणांनी केली जातात; पण आपण मूर्ख अहंकाराने मोहित होऊन 'मी'च कर्ता आहे असे समजतो. जर कर्ता करविता तो परब्रह्म परमात्मा आहे तर मी कशाला 'मी' आणि 'माझं' यात गुंतून राहतो. स्थूल देहाचा विचार केला तर आपल्याला इंद्रिय श्रेष्ठ वाटतात. इंद्रियाच्या पुढे मन श्रेष्ठ आहे आणि मनाच्या पुढे बुद्धी श्रेष्ठ आहे. पण बुद्धीच्याही पुढे आत्मा सर्वश्रेष्ठ आहे. ही विकासात्मक उकल समजली की, 'मी कर्ता' हा अहंगंड समूळ मिटेल.

भगवंत कर्मयोग सांगताना स्पष्टच सांगतात की, प्रजापती ब्रह्मदेवाने यज्ञासह प्रजा उत्पन्न केली आणि सर्वांना यज्ञकर्म हे उत्कर्षाचे साधन आहे हे स्पष्ट केले. म्हणून हे अर्जुना! यज्ञकर्म म्हणजे भगवद्कर्म असून ते सोडून अन्य कर्मात गुंतलेला मनुष्य कर्मबंधनात अडकतो. त्यामुळे यज्ञकर्म म्हणजे ईश्वराला अनुकूल कर्म तू कर!

**'कर्मे दासपणे करोनी निपूणे, नारायणा अर्पणे!' हे हवे कर्माप्रती भावसमर्पण.**

भगवान पुढे सांगतात-

**'अन्नाद्भवंति भुतानि पर्जन्यादअन्नसंभवः ।**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥'**

सर्व प्राणिमात्र अन्नातून जन्माला येतात. अन्न पर्जन्यामुळे निर्माण होते. पर्जन्य यज्ञकर्मातून उत्पन्न होतो. हाच यज्ञ कर्मापासून निर्माण होतो. एका अर्थाने जीवसृष्टीचे हे विश्वचक्र आहे. विश्वचक्राचे कारक हे कर्मच आहे. म्हणून कर्म कर! त्यातही कोणत्याही फळाची अपेक्षा न करता; ईश्वराला समर्पित केलेले कर्म चित्त शुद्ध करते. शुद्ध चित्त जीवनमुक्तीचे साधन आहे. म्हणून निष्काम कर्म महत्त्वाचे आहे. कारण इंद्रियामध्ये विषय, विषयामध्ये रागद्वेष मुक्कामी असतात. ते मोक्षमार्गाचे अडथळे आहेत म्हणून त्यांच्या आहारी न जाता सद्भावनेने कर्म केले पाहिजे. हे पार्थ! जो पुरुष या सृष्टिचक्राचे अनुसरण करीत नाही तो इंद्रिय सुखात रत होऊन पापी बनतो आणि व्यर्थ जीवन जगतो. याच अध्यायात प्रसिद्ध असे भगवंताचे मत आहे.

**'मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीनिर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥'**

हे अर्जुना! आता तू अध्यात्म बुद्धीने सर्व कर्मे माझ्यामध्ये समर्पण करून आशारहित, ममत्वरहित होऊन निश्चिंत मनाने युद्ध कर! तिसऱ्या अध्यायात भगवंताने ब्रह्मविद्या प्रतिपादित करतानाच कर्मयोग महिमा आणि कर्मयोगाचे प्रयोजन विशेषत्वाने स्पष्ट केले आहे. म्हणूनच तिसऱ्या अध्यायाला 'कर्मयोग' असे नामाभिधान केले आहे. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### महाराष्ट्रातील आमदार-मंत्र्यांचा बेशिस्तपणा

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आमदारांकडून अनेक गैरवर्तणुकीच्या बेशिस्त गोष्टी घडल्या. कुस्तीच्या आखाड्याप्रमाणे एकमेकांचे साथीदार घेऊन आमने-सामने जाणारे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड मैदानात उतरलेले सर्व जनतेला दिसले जणू काही एकमेकांची गँग यांची तयार असावी व एकमेकांवर हल्ला करावा इथपर्यंत यांची तयारी दिसली. टॉवेल आणि बनियनवर कँटिनमध्ये वावरणारे आणि वेटरला मारहाण करणारे आमदार संजय गायकवाड सर्व जनतेला दिसले. या आमदारांनी कोर्ट पेपर स्टॅम्पवर मरेपर्यंत एकमेकांना मारण्याचं आमंत्रण माजी खासदार इम्तियाज जलील यांना जाहीर दिले आहे म्हणजे हे आमदार कुठपर्यंत पोहोचलेले आहेत, हे दिसून येतं. या गोष्टी काही आमदारांच्या झाल्या, पण माणिकराव कोकाटेसारखे कॅबिनेट मंत्री मोबाईलवर अधिवेशन काळात रमी खेळत होते, हे कितपत योग्य आहे. हे कृषी मंत्री असूनही त्यांनी शेतकऱ्यांचा अनेक वेळा अपमान केला आहे. आता तर ते आपल्याच युती सरकारला भिकारी सरकार म्हणत आहेत. खरे म्हणजे यांचा धनंजय मुंडेंसारखा राजीनामा घ्यायला हवा होता. आज विधानसभेत एकमेकांच्या अंगावर जाणं, मारामाऱ्या करणं एवढे धाडस या आमदारांना झालेच कसे? हा खरा प्रश्न आहे.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

●● ●●

### इंग्लंडचा लाजिरवाणा पराभव

भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने धडक मोहीम राबवत बॅझबॉल टोळीला जेरबंद केले आहे. ओव्हल कसोटीत अंतिम दिवशी उर्वरित चार फलंदाजांना काबूत करत इंग्लिश कंपूचे आव्हान संपुष्टात आणले आहे. कसेही करून अँडरसन-तेंडुलकर चषक अपहरणाचा कट चाणाक्ष सिराजने उधळून लावला असून त्याबद्दल त्याला प्लेयर ऑफ दी मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. प्रचंड नाट्यमय आणि क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या ओव्हल कसोटीत सिराज आणि कंपनीने इंग्लंडचं वाटोळं केलं आहे. ओली सुकी जिंकणाऱ्या ओली पोपला मालिका जिंकण्यात अपयश आले असून बॅझबॉलला भारतीय संघाच्या यंग ब्रिगेडने २-२ असे थोपवले आहे. खरे तर या कसोटीत खेळपट्टीने दर दिवशी नवनवीन नखरे दाखवले. पहिले दोन दिवस लाजत, मुरडत ती गोलंदाजांच्या प्रेमात होती. तिच्या बाऊंस आणि सीम पुढे दोन्ही संघांचे नामचीन फलंदाज ताथा थैय्या करत होते. भारतीय संघाने धडपडत कसेबसे सव्वादोनशे गाठले तर इंग्लंडचा संघ अडीचशेत आटोपला. दुसऱ्या दिवशी खेळपट्टीच्या जरा जरा टच मी टच मी टच मी स्वभावाला सोळा फलंदाजांना नादी लागले. पण दुसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात खेळपट्टीने नमते घेतले आणि तिसऱ्या दिवशी तर कमालच केली. जणू काही पहिले दोन दिवस काही झालेच नाही या थाटात खेळपट्टी फलंदाजांवर मोहित झाली. आकाशदीप नावाचा टेलएंडर तिथे ६६ धावांचा आकाश दिवा लावून गेला. तिसरा दिवस गाजवला तो यशस्वी जैस्वालने. खेळपट्टी कशीही असो, प्रसंग कोणताही असो त्याचा सरळसोट फॉर्म्युला असतो, डर के आगे जीत है! त्याच्या बेधडक शतकाने भारतीय संघाने जवळपास चारशे धावांची मजल मारली. अर्थातच यात जडेजा, वॉशिंग्टन या अष्टपैलू जोडीच्या अर्धशतकी खेळींचा समावेश होता. विशेषतः वॉशिंग्टनने सुंदरने डावाच्या अखेरीस फलंदाजीत जो घणाघात केला, तोच शेवटी निर्णायक ठरला. मात्र सामन्यात अजूनही दोन दिवस बाकी असल्याने हा सामना बरोबरीत होता. वास्तविकतः ऋषभ पंत, बुमराह हे प्रमुख खेळाडू नसतानाही भारताने मिळवलेला विजय कौतुकास्पद आहे. संपूर्ण कसोटी मालिकेत भारतीय गोलंदाजीचे ओझे वाहणाऱ्या सिराजने २३ बळी घेत डॉनची भूमिका बजावली.

**अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

●● ●●

### भावांनो, लव्ह जिहादपासून आपल्या भगिनींना वाचवा

रक्षाबंधन हा श्रावण महिन्यातील महत्त्वाचा आणि भावा-बहिणीच्या प्रेमाच्या नात्याचा सण. बहीण-भावाच्या नात्याची, श्रीकृष्ण-द्रौपदी, ज्ञानेश्वर-मुक्ताई ही उदाहरणे आपल्याला माहीत आहेत. आजच्या काळातही बहीण-भावाचे नाते असेच असावे असे सर्वांनाच वाटते. पण सध्याची परिस्थिती बघता केवळ आपली बहीणच नाही, तर आपल्या सर्व भगिनी सुरक्षित असाव्यात, कुठल्याही व्यक्तीने तिला फसवून त्रास द्यायचा प्रयत्न करू नये असे प्रत्येक भावाला वाटले पाहिजे. मुलींना प्रेमाच्या खोट्या जाळ्यात अडकवून लग्न करणे, तिला त्रास देणे आणि नंतर तिची हत्या करणे असे प्रसंग वृत्तपत्रांमधून रोजच आपण वाचत असतो. कित्येक मुस्लिम तरुण आपले नाव बदलून हिंदू मुलींना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. लग्न करून त्यांना धर्मांतर करायला भाग पडतात. हे प्रेम नसून लव्ह जिहाद आहे. यातून आपल्याला काही सुख मिळणार नाही, प्रेम मिळणार नाही. फक्त बदनामी, मनस्ताप आणि यातनाच आपल्या वाट्याला येतात. आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्ती कशा आहेत हे आपल्याला समजायला हवे. त्यासाठी आता आपण भगवान श्रीकृष्णालाच बंधू म्हणून आपल्या रक्षणासाठी भक्तीची राखी बांधूया. ▮

**रेवती मुकुंद भोपी**/खामगाव

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# रेल्वे स्थानकावर उभे असलेल्या दोन डब्ब्यांना अचानक लागली आग

## कोणतीही जिवीत हानी नाही, दोन तासांत आग विझवण्यात यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**

हिंगोली येथील रेल्वे स्थानकात उभ्या असलेल्या एका डब्यातून धूर येत असल्याचे रेल्वे पोलिसाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता डब्याला आग लागल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ स्टेशन मास्तर व अग्नीशमन दलाला संपर्क साधला. आगीत डब्यांचे नुकसान झाले असून साहीत्य जळून खाक झाले आहे. अग्नीशमन दलाने दोन तासात आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे रेल्वेच्या सुत्रांनी सांगितले असून ही आग अज्ञान व्यक्तीने लावल्याचा संशय व्यक्त होत आहे.

येथील रेल्वे स्थानकात रेल्वे प्रशासन व आपत्तीव्यवस्थापन यांच्यावतीने दि २१ एप्रील रोजी मॉकड्रील घेण्यात आले होते. यावेळी रेल्वेच्या चार डब्यांना आग लागल्यानंतर रेल्वेचे आपत्ती व्यवस्थापन पथक तसेच नगर पालिकेचे पथक व जिल्हा प्रशासनाचे आपत्ती व्यवस्थापन पथक किती वेळात पोहोचते याचा आढावा घेण्यात आला होता. यावेळी रेल्वे प्रशासनातील अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारीही उपस्थित होते. पथक घटनास्थळी पोहोचल्यानंतर डब्यात अडकलेल्या प्रवाशांना कसे बाहेर काढायचे, आगीवर कसे नियंत्रण मिळवायचे याची माहीती देण्यात आली होती. या मॉकड्रिलमध्ये खराब झालेले रेल्वेचे डबे रिसालाबाजार रेल्वे पूलाच्या बाजूला रेल्वे रूळावर उभे करून ठेवण्यात आले होते.

दरम्यान आज सकाळी साडे आठच्या सुमारास त्यापैकी एका डब्यातून धूर निघत असल्याचे रेल्वे पोलिस कर्मचारी प्रभाकर इंगोले यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने घटनास्थळी पाहणी केली असता आग लागल्याचे दिसून आले. त्यांनी तातडीने या घटनेची माहीती रेल्वे स्टेशन मास्तर व पालिका मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांना दिली. अग्नीशमन दलाचे पथक व रेल्वे पोलिस विभागाचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत खंदारे, जमादार प्रभाकर इंगोले, अंकुश बांगर, विश्वांभर शिंदे, मोतीराम काळे यांनी आगीवर नियंत्रण मिळवले.

तब्बल दोन ते अडीच तासानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. यामध्ये दोन डब्यांमधील मॉकड्रिलनंतरचे शिल्लक साहीत्य जळाले. सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित हानी व वित्त हानी झाली नाही. सदरदील अज्ञात व्यक्तीने लावल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

हिंगोली रेल्वे स्टेशनवर केवळ चार पोलिस कर्मचारीच तैनात असून रात्रीच्यावेळी या ठिकाणी प्रवाशांची तसेच रेल्वे स्थानकाची सुरक्षा रामभरोसे असते. त्यामुळे चोऱ्यांचे प्रमाणात वाढ होत असून चोरटे रात्री चोऱ्या करून पहाटे ४.२० वाजता मुंबईकडे निघणाऱ्या रेल्वे गाडीत पसार होत असल्याचेही बोलले जात आहे.

# ग्रामीण भागातील शेतीची अतिक्रमणे नियमानुकुल करा

## बिगर सातबारा शेतकरी संघटनेची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**

राज्यातील दलीत, आदिवासी भूमीहीन ओबीसी, गरीब मराठा समाजाच्या भूमीहीन लोकांनी महसुल व वन सुधार शेती प्रयोजनासाठी अतिक्रमणे केलेली आहेत. ग्रामीण भागातील निवासी अतिक्रमणे नियमानुकुल करावीत तसेच शेती शेतकऱ्यांच्या नावे करावी अशी मागणी बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्यावतीने अतिक्रमीत घरे व शेती नियमानुकुल करून संबंधित शेतकऱ्यांच्या नावे करावी तसेच महाविकास आघाडी सरकारने जारी केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत आदी मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

मागील अनेक वर्षापासून बिगर सातबारा शेतकरी संघटना या न्याय मागणीसाठी व हक्कासाठी आंदोलन करीत आहे परंतु शासनाने अद्याप ग्रामीण भागातील अतिक्रमीत घरासाठी जागा, शेती शेतकऱ्यांच्या नावे केली नाहीत त्यामुळे बिगर सातबारा शेतकरी संघटना या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी दि ३० ऑगस्ट रोजी विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांच्या नेतृत्वात संभाजीनगर ते मुंबई येथील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यापर्यंत पायी मोर्चा काढणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर राजु इंगोले, शिवाजी नागरे, सोपान कांबळे, गजानन हनवते, रतन वानखेडे, सदाशिव माडके, दत्तराव सावळे, बालु वानखेडे आदीसह मोठ्या संख्येने बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व महिला यांची उपस्थिती होती.

# मध्यप्रदेशातील अल्पवयीन मुलीवर हिंगोलीत अत्याचार

## अल्पवयीन मुलासह एका व्यक्तीवर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**

वुई प्ले ॲपवरून ओळख झालेल्या मध्यप्रदेशातील बैतुल भागातील एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या अल्पवयीन मुलासह एका व्यक्तीवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत मंगळवारी दि ५ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दोघांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत एका भागातील अल्पवयीन मुलाची वुई प्ले ॲपवरून मध्य प्रदेशातील बैतूल भागातील एका अल्पवयीन मुलींशी ओळख झाली होती. या ओळखीनंतर त्यांनी काही दिवस एकमेकांसोबतच मोबाईलवरून चॅटींग केले त्यानंतर संभाषणही सुरू केले. हिंगोली येथील अल्पवयीन मुलाने तिला लग्नाचे आमिष दाखवून हिंगोलीत बोलावून घेतले. त्यानुसार ती मुलगी घरून निघून थेट हिंगोलीत पोहोचली. त्यानंतर अल्पवयीन मुलाने तिला दि १३ जुलै ते १६ जुलै या कालावधीत त्याच्या घरी ठेवून तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर अल्पवयीन मुलाशी लग्न करायचे असेलत तर माझ्या सोबत संबंध ठेवावे लागतील असे सांगत दिपक नागपुरे याने त्या मुलीवर अत्याचार केला. या प्रकारानंतर मुलीने घरी सोडण्याची विनंती केली. मात्र त्यांनी तिला घरी सोडले नाही. त्यामुळे मुलीने १०० नंबरवर संपर्क साधून मदत मागितली. ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शामकुमार डोंगरे, उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, जमादार बाळसाहेब खोडवे, आकाश पंडीतकर, आशिष उंबरकर यांच्या पथकाने त्या मुलीची सुटका करून पोलिस ठाण्यात आणले. मुलीच्या तक्रारीवरून अल्पवयीन मुलासह दिपक नागपुरे याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी चौकशीसाठी दोघांनाही ताब्यात घेतले आहे.



हिंगोली- रक्षाबंधनाचा सण अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला असून यानिमित्त हिंगोली येथील बाजारपेठेत विविध प्रकारच्या आकर्षक राख्या विक्रीसाठी आल्या आहेत. लाडक्या भावाला राख्या बांधण्यासाठी मोठ्या संख्येने महिला तसेच तरूणी बाजारपेठेत राखी खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

हिंगोली- प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार हा भारत सरकारकडून विविध क्षेत्रातील मुलांच्या अपवादात्मक कामगिरीची दखल घेण्यासाठी दिला जातो. गुणवंत तरुणांना सन्मानित करण्यासाठी हा पुरस्कार सहा श्रेणींमध्ये दिला जातो. हा पुरस्कार शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला आणि संस्कृती आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान १८ वर्षांखालील मुलांना (१५ ऑगस्ट २०२५ रोजीपर्यंत) या क्षेत्रात उत्कृष्टता आणि उल्लेखनीय योगदानासाठी दिला जातो. यामध्ये बालक हा भारतीय नागरिक आणि भारताचा रहिवासी असावा. त्याचे वय निकष ५ ते १८ वर्षे पूर्ण असावे. नामांकनाच्या शेवटच्या तारखेपूर्वी २ वर्षांच्या आतील कृती/कामगिरी केलेली असावी. कोणतीही व्यक्ती किंवा संस्था नामांकन करू शकते. मुले स्व-नामांकनाद्वारे देखील अर्ज करू शकतात. सर्व नामांकने ही १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन सादर करावीत. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी निवड झालेल्या लाभार्थी बालकांना पदक, प्रमाणपत्र, प्रशस्तीपत्र देण्यात येईल. यामध्ये जास्तीत जास्त २५ अर्ज मर्यादा असून, यामध्ये समितीकडून अर्जसंख्या शिथिल केले जाऊ शकते, असे जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाने कळविले आहे.

### प्रधानमंत्री पीकविमासाठी ३१ ऑगस्टपर्यंत वाढ

हिंगोली- राज्य शासन खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबवित आहे. या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी आता ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपले पीक संरक्षित करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे. हिंगोली जिल्ह्यामध्ये गत वर्षीच्या तुलनेत कमी सहभाग, शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक फार्मर आयडी नसणे, प्रधान मंत्री फसल बीमा योजना पोर्टल सेवेतील व्यत्यय, आधार व आपले सेवा केंद्र सर्व्हरवरील व्यत्यय, जिल्ह्याच्या भूमी अभिलेख पोर्टलच्या तांत्रिक/सेवेतील व्यत्यय इत्यादीमुळे शेतकऱ्यांच्या योजनेतील सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने नुकतीच योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी दि.१४ तर कर्जदार शेतकऱ्यांना दि.३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री फसल बीमा योजना या पोर्टल स्वतः तसेच बँक, विमा कंपनीचे एजंट, क्रॉप इन्शुरन्स ॲप व सामूहिक सेवा केंद्रामार्फत योजनेत नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी संबंधीत पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

### ५३ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५३ वाहन चालकांवर पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ५० हजार रूपये दंड वसुल केला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत आणि जुगार कायद्यांतर्गत प्रत्येकी एका ठिकाणी छापे मारून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वीज जोडणीच नाही, बिल मात्र साडेसात हजार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ६ ऑगस्ट**



तालुक्यातील सवड येथील शेतकऱ्याला वीज जोडणी देण्यात आली नाही मात्र त्याला ७ हजार ८५० रूपयांचे बिल आकारण्यात आले आहे. संबंधित शेतकरी येथील महावितरण कार्यालयात चकरा मारीत आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की सवड येथील शेतकरी प्रल्हाद सखाराम सोळंके यांनी महावितरणकडे वीज जोडणीसाठी अर्ज केला होता. परंतु अद्याप त्यांना वीज जोडणी झाली नाही मात्र महावितरणने वीजबिल ७८५० रूपये इतके आकारले. वीजच नाही मिळाली तर लाईटबिल कसे आले अशी विचारणा करण्यासाठी शेतकरी सोळंके यांनी थेट हिंगोली येथील महावितरणच्या उपविभाग कार्यालय गाठले असून यावरून पुन्हा एकदा महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

# लेखी आश्वासनानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे, १३ ऑगस्टपर्यंत पदोन्नती मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**



जिल्हा परिषदेच्या अंतर्गत काम करणाऱ्या जवळपास ५०० आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या अनेक दिवसापासून रखडल्या आहेत. त्यामुळे मंगळवार दि. ४ ऑगस्ट पासून आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या समोर अमरण उपोषण करण्याचा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे दिला होता. मात्र जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी १३ ऑगस्ट अखेर पदोन्नती करण्याचे लेखी आश्वासन संघटनेच्या पदाधिकारी यांना दिल्याने संघटनेने आपले आमरण उपोषण तूर्तास मागे घेतले.

आरोग्य कर्मचाऱ्यांच्या यात महिला व पुरुष गटातील पदोन्नतीचे प्रस्ताव निकाली काढा, १०,२०,३० चे कालबाह्य पदोन्नतिचे प्रस्ताव तातडीने निकाली काढणे, मागील तीन वर्षापासून अनेक सेवानिवृत कर्मचारी लाभापासून वंचित आहेत. स्त्री परिचरची रिक्त पदे भरून काढा या प्रमुख मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने जिल्हा परिषदेच्या विरोधात हत्यार उपसले असून मंगळवार पासून जिल्हा परिषदेच्या समोर मागण्या पदरात पडणार नाहीत तोपर्यंत अमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला होता.

दरम्यान, यापूर्वी देखिल संघटनेकडून निवेदन दिले होते. केवळ तोंडी आश्वासन देऊन तोंडाला पाने पुसली, मात्र मागण्या काही पूर्ण केल्या नाहीत, चार ऑगस्ट पर्यंत संघटनेने मागण्या पूर्ण होतील या आशेने आरोग्य विभागात भेट दिली. परंतू संबंधित शाखेकडून कारवाई झाली नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने संघटनेने मंगळवार पासून अमरण उपोषण छेडण्याचा इशारा आरोग्य यंत्रणेला दिला आहे. मात्र जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी १३ ऑगस्ट पर्यंत मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन संघटनेला दिल्यामुळे संघटनेने आमरण उपोषण तूर्तास मागे घेतले आहे. १३ ऑगस्ट नंतर मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.यावेळी बबन कुटे, हरीशचंद्र गोलाईतकर , महिला अध्यक्षा ज्योती बांगर, संगीता गोबाडे, नंदा चव्हाण, कीर्ती सीताबराव, नरेश पत्की, गोपाल हाके, नंदकिशोर कोकाटे, एस. के. मठपती, एन. ए. कोकाटे, एस. एम. मस्के, यु. एल. थिटे, ए. एम. पुंडगे आदींची उपस्थिती होती.

# सेवानिवृत्त शिक्षकांचे विविध मागण्यांसाठी बीडीओंना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**

महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्यावतीने मंगळवारी ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालयामध्ये सेवानिवृत्त शिक्षकांच्या विविध मागण्या संदर्भामध्ये निवेदन दिले आहे.

सदरील निवेदन गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांनी स्वीकारले. औंढा नागनाथ तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे पेन्शन दरमहा एक तारखेलाच करणे ,नव्याने सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे उपदान व अंशदान रक्कम तात्काळ अदा करणे. सर्व सेवानिवृत्त शिक्षकांना आपल्या स्वाक्षरीचे ओळखपत्र द्यावे या मागण्या तात्काळ सोडाव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष मुरलीधर कदम, के के गोरे, ए डी पोफाळकर, बी जी काळे, एस पी कदम, हनुमंत शेळके, आर यु नागरे, आर आर शेळके, एम एस पोटे, आर जी देशपांडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सुनीता मुळे यांच्या निवडीमुळे भाजपची ताकद वाढणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ ऑगस्ट**



भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजाननराव घुगे यांनी नुकतीच जिल्हा कार्यकारीणी जाहीर केली असून यामध्ये भाजपच्या जिल्हा सरचिटणीसपदी श्रीमती सुनिता मुळे यांची निवड करण्यात आली आहे. श्रीमती सुनिता मुळे यांच्या निवडीमुळे भाजपमधील महिला ब्रिगेडला निश्चितपणे मोठे बळ मिळणार आहे.

सुनिता मुळे यांनी व्यापार, सामाजिक व राजकीय अश्या विविध क्षेत्रांमध्ये काम केलेले आहे. त्यांनी केलेल्या तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर केलेल्या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांना सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे. सुनिता मुळे यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, प्रांत सदस्य ते राष्ट्रीय संघटक अशी उत्तुंग भरारी घेतली आहे. जिजाऊ ब्रिगेड मध्ये सुद्धा त्यांना राष्ट्रीय संघटक हे पद त्यांच्या जिजाऊ ब्रिगेडच्या कार्यामुळे मिळालेले आहे. ताईंना स्वर्गीय माणिकराव मुळे त्याचे पती यांची सुद्धा खंबीर साथ त्यांना होती. त्यांचे पती त्यांना सार्वजनिक जीवनामध्ये काम करण्यासाठी नेहमी प्रोत्साहन देत असत. हिंगोली जिल्हा महिला व्यापारी महासंघ हिंगोलीच्या जिल्हा अध्यक्ष म्हणून सुद्धा अतिशय चांगले काम त्यांचे आहे. विविध संघटनेमध्ये त्यांनी काम केल्या कारणाने व चांगल्या वक्त्या असून उच्च विद्या विभूषित आहेत. त्यांच्यामध्ये संघटन कौशल्य आहे. त्यामुळे त्यांना भारतीय जनता पक्षांनी एक मोठी जबाबदारी हिंगोली जिल्ह्यासाठी दिलेली आहे. त्यांच्या निवडी बद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ज्येष्ठांच्या हाडे व सांधा तपासणी शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** इंडियन ऑर्थोपेडिक असोसिएशन अंतर्गत महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन, लातूर, ऑर्थोपेडिक असोसिएशन आणि पोद्दार ॲक्सिडेन्ट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्यावतीने पोद्दार हॉस्पिटलमध्ये ६० वर्षे व त्यावरील रुग्णांसाठी ३ ते १० ऑगस्ट २०२५ या कालावधीत हाडे व सांधा आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहास ज्येष्ठ नागरिक व रुग्णांचा प्रतिसाद मिळत आहे.



या उपक्रमांतर्गत ६० वर्षांवरील व्यक्तींसाठी बाह्यरुग्ण विभाग, एक्सरे, रक्त तपासणी आणि फिजिओथेरपीमध्ये २५ टक्के सवलत देण्यात येत आहे. तसेच या रुग्णांची मशीनद्वारे हाडांची ठिसूळता तपासणी मोफत करण्यात येत आहे. या उपक्रमाचा तीन दिवसांमध्ये शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला. पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने सातत्याने रुग्णसेवेसाठीचे विविध उपक्रम, आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसोबतच लातूरच्या मातोश्री वृध्दाश्रमातील आजी-आजोबांसाठी तपासणी व औषधोपचारही केले जाणार आहेत. तसेच वाढत्या वयात आपल्या हाडांची काळजी कशी घ्यावी?, आहार काय घ्यावा, काय घेऊ नये?, व्यायाम कशाप्रकारे करावा?, आदी विषयांवर ज्येष्ठ रुग्णांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अशोक पोद्दार यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६.५ मिलीमीटर पावसाची नोंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** जिल्ह्यात ०६ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६.५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये अहमदपूर तालुक्यात सर्वाधिक २०.३ मिलीमीटर, तर लातूर तालुक्यात सर्वात कमी ०.८ मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ०.८, औसा- ३.८, अहमदपूर- २०.३, निलंगा- १३.२, उदगीर- ३.३, चाकूर- ३.९, रेणापूर- ९.०, देवणी- २.५, शिरूर अनंतपाळ- १.६ आणि जळकोट- ३.० मिलीमीटर.

## लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत 'टीबीमुक्त गाव माझी जबाबदारी - टीबीमुक्त ग्रामपंचायत' अभियान राबविले जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होऊन लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

'टीबीमुक्त गाव माझी जबाबदारी' अभियानांतर्गत सलग दोन वर्षे क्षयरोगमुक्त राहिलेल्या ३२ ग्रामपंचायतींचा 'सिल्व्हर अवॉर्ड' (रौप्य पुरस्कार) देऊन गौरव करण्यात आला. हा गौरव सोहळा मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, डॉ. कौस्तुभ दासगुप्ता, अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अलका बांगर आणि सांख्यिकी अन्वेषक श्रीमती किरण चोथे आदी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्याच्या विकासाचा माईल स्टोन म्हणजे विभागीय क्रीडा संकुल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देशासह महाराष्ट्राचा विकास गतीने होत आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्यासाठी विकासाची गंगा वाहत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे कव्हा येथील विभागीय क्रीडा संकुल आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याच्या विकासाचा माईल स्टोन ठरणाऱ्या विभागीय क्रीडा संकुलचा भूमिपूजन सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

कव्हा येथील विभागीय क्रीडा संकुल भूमिपूजन व प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटन सोहळा यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन दि. ८ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पूर्व तयारीसाठी लातूर शहर भाजपा कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर बोलत होते. यावेळी लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, देविदास काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अविनाश बट्टेवार यांच्यातर्फे काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष साळुंके यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** लातूर जिल्हा काँग्रेसचे नूतन अध्यक्ष अभय साळुंके यांचा धर्मवीर औदुंबर पाटील बट्टेवार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा लातुर शहर जिल्हा काँग्रेस सचिव अविनाश बट्टेवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. काँग्रेस भवन येथे झालेल्या कार्यक्रमात नूतन जिल्हाध्यक्ष अभय साळूंके यांनी जिल्हाध्यक्षपदाचा पदभार घेतल्यानंतर अविनाश बट्टेवार यांनी त्याचा सत्कार केला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, ॲड.समद पटेल , कल्याण पाटील, एन.आर. पाटील, डॉ. दिनेश नवगिरे, सिकंदर पटेल, व्यंकटेश पुरी, अँड देविदास बोरुळे पाटील, प्रा.प्रविण कांबळे आदी उपस्थित होते.

## श्री वैद्यनाथाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचे पैसे व मोबाइल पळविले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** मध्य प्रदेशातील सोळा महिला भाविक श्रावण मासानिमित्त बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी दोन वाहनांमधून निघाल्या होत्या. दरम्यान, औसा तालुक्यातील उजनी येथील एका पेट्रोल पंपावर चोरट्यांनी या महिला भाविकांचे मोबाइल आणि पैसे दागिने लुटल्याची घटना मंगळवारी (दि.५) पहाटेच्या सुमारास घडली. याबाबत तक्रारदार महिलेने प्रसार माध्यमाला माहिती दिली आहे. मात्र, भादा पोलिसांनी या महिलांकडील तीन जुने वापरते मोबाइल गहाळ झाले असून, अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नाही, असे सांगितले.

### मोबाईल गहाळ झाल्याची नोंद

या भाविकांनी मोबाइल आणि कपडे चोरीस गेल्याचे सांगितले. यानंतर घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच सीसीटीव्ही फुटेजही तपासले. मात्र, चोरीचा प्रकार दिसून येत नाही. यातील तिघांकडील जुने वापरते चार-पाच हजार रुपये किमतीचे तीन मोबाइल गहाळ झाले आहेत. त्याचा तपास सुरू आहे, अशी माहिती भादा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महावीर जाधव यांनी 'संचार'शी बोलताना दिली.

मध्यप्रदेश राज्यातील हक्कमसिंग चौहान, धर्मेंद्र प्रजापती, आकाश भार्गव, आयुश चौहान, मोहनसिंग विश्वकर्मा, कोमलसिंग विश्वकर्मा, पूजा चौहान, नमिता धाकड, नीशा धाकड, हिराबाई चौहान, ममताबाई रामेतीबाई, कुंवरबाई धाकड, कमलाबाई विश्वकर्मा, श्रीबाई धाकड, ससी धाकड हे भाविक श्रावण मासानिमित्त तुळजापूर येथील आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या श्री वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी दोन वाहनांमधून परळी वैजनाथच्या दिशेने जात होते. सोमवारी रात्री औसा तालुक्यातील उजनी येथील एका पेट्रोल पंपावर हे भाविक झोपले असता, त्यांच्याजवळील पाच मोबाइल, एटीएम कार्ड, २० हजार रुपये रोख आणि नवीन खरेदी केलेल्या कपड्यांसह वाहनांच्या स्टँडवर बांधून ठेवलेल्या लगेज बॅग पळवल्याची घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली.

औसा-तुळजापूर महामार्गावर काही दिवसांपूर्वीच वांगजी पाटी येथील एका बिअर बारमधून लाखो रुपयांची विदेशी दारू चोरल्याची घटना आणि दोन दिवसांपूर्वी याच महामार्गावरील शिवली मोड ते शिंदाळा दरम्यान दरोड्याच्या तयारीत असलेल्या बीड जिल्ह्यातील पाच सराईत गुन्हेगारांना नागरिकांच्या सतर्कतेमुळे पोलिसांनी गजाआड केले आहे. वारंवार घडणाऱ्या घटनेमुळे पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी सतर्क राहून रात्री पेट्रोलिंग करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. असे असताना दुसरीकडे चोरीच्या घटनेचे सत्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे.

## तरुणाचे अपहरण करून रॉड व स्टम्पने बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** माझ्या मुलास फोनवर शिवीगाळ का केलास, असे म्हणून वडिलाने मुलगा आणि इतर तिघाजणांनी संगनमत करून एका तरुणाचे अपहरण करून शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसर आणि सारोळा रोडवर रॉड, स्टम्प आणि लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून जखमी केले, तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली असून, याप्रकरणी मंगळवारी पहाटे गांधी चौक पोलीस ठाण्यात पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी सांगितले, आकाश बालाजी कुटवाडे (वय २४, रा. कोल्हेनगर, लातूर) याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, यश विजय नरहरे, विजय नरहरे आणि इतर तिघाजणांनी फोनवर झालेल्या बाचाबाचीवरून आकाश कुटवाडे याला यश विजय नरहरे, विजय नरहरे, प्रसन्न नरहरे (सर्व रा. साळे गल्ली, लातूर) आणि इतर तीन अनोळखी आरोपींनी संगनमत करून सोमवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास लातूर शहरातील मध्यवर्ती बसस्थनकाच्या शेजारी असलेल्या एका लॉजच्या परिसरात बोलावून घेतले. तू माझ्या मुलास फोनवर झालेल्या बाचाबाचीतून शिवीगाळ का केली, तुला याची किंमत चुकवावी लागेल, असे म्हणत आरोपींनी फिर्यादी आकाश कुटवाडे याला रॉड आणि स्टम्पने मारहाण केली. तसेच एका चारचाकी वाहनात जबरदस्तीने घालून अपहरण करून त्याला सारोळा रोड येथील विजय नरहरे यांच्या शेतामध्ये नेले. त्या ठिकाणीही आकाश कुटवाडे याला रॉड, स्टम्प, लाथा-बुक्क्याने मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली, असे नमूद केले आहे.

त्यानुसार मंगळवारी पहाटे यश विजय नरहरे, विजय नरहरे आणि इतर तिघाजणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे हे करत आहेत.

## दुसऱ्या श्रावण सोमवारी मंदिरांना बहर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** पवित्र असलेल्या श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी (दि.४) येथील तळ्यातील महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनसाठी गर्दी केली होती. मंदिर परिसराला भाविकांच्या गर्दीमुळे जत्रेचे स्वरूप आले होते. पहाटेपासूनच नागरिकांनी रांगेत उभे राहून महादेवाचे दर्शन घेतले.

श्रावण महिना हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या महिन्यात संपूर्ण महिनाभर विविध देवतांच्या पोथी पुराणांचे पठण केले जाते. पावसाळाही भरपूर असल्याने जिकडे-तिकडे हिरवळ पसरलेली असते. वातावरण प्रसन्न असते. या महिन्यात संपूर्ण महिनाभर मांस सेवन वर्ज्य असते. देवाचे नाम स्मरण घेतले जाते. या महिन्यात सोमवारला महत्व आहे. या दिवशी महादेवाला बेल-फूल, विभूती, पेढा, श्रीफळ वाहून दिवसभर उपवास केला जातो. सकाळीच महादेवाचे दर्शन घेण्यात येते. महादेवाच्या नंदीलाही पूजण्यात येते. सोमवारी पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. भाविकांसाठी प्रसादाची दुकानेही मोठ्या प्रमाणावर थाटण्यात आली होती. दुसरा सोमवार असल्याने या दिवशी गेल्या सोमवारच्या तुलनेत गर्दी वाढल्याचे दिसून आले.

## 'त्या' मुलींवर अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कठोर कारवाई करा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** पुण्यात मुलींना शिवीगाळ करून अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील एक महिला सासरच्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून पुण्यात आली होती. तिला आधार देणाऱ्या तीन मुलींच्या घरात घुसून या मुलींना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली, त्यानंतर पोलीस ठाण्यात नेवून त्यांचा पोलिसांनी छळ केला. हे प्रकरण गंभीर असून, कोथरूड पोलीस ठाण्याचे दोषी पोलीस आणि संभाजीनगरच्या निवृत्त पोलीस अधिकाऱ्यावर ॲट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

यावेळी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष बावगे यांच्यासह राज्य सरचिटणीस उतरेश्वर बिराजदार, जिल्हाध्यक्ष डॉ. सोमनाथ रोडे, राज्य कार्यवाह अनिल दरेकर, दिलीप अरळीकर, रणजित आचार्य, जिल्हा उपाध्यक्ष सुनीता अरळीकर, शहराध्यक्ष बब्रुवान गोमसाळे, डॉ. गणेश गोमारे, शैलजा बरूरे, दीपरत्न निलंगेकर, नरसिंग घोडके, डॉ. क्रांती मोरे, मंगल शिंदे, श्रीधर शेवाळे आदींची उपस्थिती होती.

## धम्माच्या आचरणातूनच मानवाला दुःखातून मुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** मानवाच्या दुःखाचे मूळ कारण अविद्या असून, धम्माचे योग्य आचरण करूनच या दुःखातून मुक्ती मिळवता येते, असे प्रतिपादन भंते महाविरो थेरो यांनी केले.

शहरातील बौध्दनगरातील वैशाली बुध्द विहार येथे आयोजित वर्षावास पुण्य पर्वानिमित्त बौध्द उपासक-उपासिका संस्कार शिबिरात ते बोलत होते.

यावेळी भंते महाविरो थेरो म्हणाले, दुःखातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक मानवाने धम्माचे योग्य आचरण करणे आवश्यक आहे. भगवान बुध्दांनी ४५ वर्षे याच गोष्टीवर भर दिला होता. मानवाने आपली अविद्या नष्ट करून आपल्या अंतःकरणात प्रज्ञा चक्षु निर्माण करणे हे मानवजातीचे नैतिक कर्तव्य आहे, असे ते म्हणाले.



यावेळी त्यांनी कौटुंबिक आणि सामाजिक व्यवस्थेवरही भर दिला. जो समाज पुन्हा-पुन्हा एकत्र येतो, विचारविनिमय करतो आणि एकमताने निर्णय घेतो, त्या समाजाला कोणीही हरवू शकत नाही, असे बुध्दांनी सांगितले आहे.

जो व्यक्ती आपल्या माता-पित्याची सेवा करतो, तोच आपल्या समाजबांधवांची सेवा करू शकतो आणि धम्मासाठी विशेष त्याग करू शकतो. जे आपल्या माता-पित्यांचा गौरव करत नाहीत, ते परिवार, समाज आणि पर्यायाने धम्मासाठी काहीच करू शकत नाहीत. परिणामी, धम्माचा विकास होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अनेक मान्यवर आणि उपासक - उपासिका उपस्थित होते. सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले.

## कनिष्ठ अभियंता संघटनेतर्फे विद्यार्थिनींना सायकल वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** कनिष्ठ अभियंता संघटना महाराष्ट्र राज्य लातूर शाखेच्यावतीने गरजू ५१ विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. संघटनेच्या या विधायक कार्यामुळे लाभार्थी विद्यार्थिनींना त्यांच्या शाळेत वेळेत पोहचणे शक्य होणार आहे.

औसा रोडवरील विश्रामगृहात झालेल्या या कार्यक्रमास प्रेरणा पाटील निलंगेकर, संजीवनी कराड, संघटनेचे जिल्हा सचिव विजय औंढे, कार्यकारी अभियंता महेंद्र काळे, महेश मिरकले, सुरेंद्र चव्हाण, भीमाशंकर हुलसुरे, प्रकाश रायभोगे, विवेक पाटील, वैजनाथ खटाळ, मालू, दीपिका खंदाडे, स्वाती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी संघटनेच्या या बांधिलकीचे कौतक करत अशा सामाजिक कार्याचा अधिकाधिक विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. ज्या मुलींचे घर ते शाळेचे अंतर किमान तीन ते पाच किलोमिटर आहे व ज्यांची सायकल घेण्याची आर्थिक परिस्थिती नाही अशा विद्यार्थिनींना या सायकली देण्यात आल्याचे औंढे यांनी सांगितले. यापूर्वी संघटनेने आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांना, पूरग्रस्तांना मदत केली असून, कोविडमध्येही सेवाकार्य केल्याचे ते म्हणाले.

उपकार्यकारी अभियंता विजय औंढे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांनी त्यांना मिळालेल्या भविष्य निर्वाह निधीतील दहा लाख रुपये सामाजिक कार्यासाठी बँकेत ठेवले असून, त्या रकमेच्या व्याजातून मिळणाऱ्या निधीतून विविध विधायक कामे केली जाणार असल्याचे औंढे यांनी सांगितले. यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

## बसवेश्वर महाविद्यालयाचा अ विभाग क्रॉसकंट्री स्पर्धेत संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ ऑगस्ट -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व जयक्रांती महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अ विभाग क्रॉस कंट्री (१० किलोमीटर) धावणे या स्पर्धेत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचा संघ प्रथम येऊन सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे.

विजयी संघात सर्वप्रथम गौरव कांबळे (बीए प्रथम वर्ष) यांनी प्रथम क्रमांक पटकावला व कृष्णा शेळके (बीए तृतीय वर्ष), प्रशांत आयरेकर (बीए तृतीय वर्ष), पुट्टेवाड संगमेश्वर (एम ए द्वितीय वर्ष), कसबे राजू (एमए द्वितीय वर्ष), शेळके साईराज (बीकॉम द्वितीय वर्ष) गायकवाड अजय (एम ए प्रथम वर्ष), सर्व खेळाडूंनी विजयी संघात मौलिक साथ दिली. विजय संघाचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई पुष्पहार देऊन सन्मान केला. यावेळी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भास्कर रेड्डी, क्रीडा विभाग समितीतील सदस्य डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. जितेंद्र देशमुख, डॉ. गुणवंत बिराजदार, डॉ. घन:श्याम ताडेवार, प्रा. आशिष क्षीरसागर, प्रा. विष्णू तातपुरे आदी उपस्थित होते.



यावेळी विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आपण स्पर्धा ही केवळ पारितोषिकासाठी न खेळता त्यामध्ये आपले प्रतिनिधीत्व असावे म्हणून तो खेळ किंवा त्या स्पर्धेमध्ये भाग घेतला पाहिजे. आपण क्रॉस कंट्री या खेळामध्ये मिळवलेले उज्वल यश हे महाविद्यालयासाठी भूषण आहे यासंबंधी त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भास्कर रेड्डी यांना यांनी केले तर आभार प्रा. आशिष क्षीरसागर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंगनाथ लांडगे आणि अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# महादेव मुंडे खून प्रकरणी एसआयटीप्रमुख पंकज कुमावत यांचे आवाहन

## व्हाट्सअप नंबर जारी करत प्रकरणाची माहिती देणाऱ्यास बक्षीसही देणार असल्याची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून नियुक्त करण्यात आलेल्या एस.आय.टी.चे (SIT) प्रमुख पंकज कुमावत यांनी आता नागरिकांना थेट आवाहन केले आहे. कोणाकडे महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी, असे आवाहन पंकज कुमावत यांनी केलय. त्यासाठी कुमावत यांनी ९९९०७८२४३१ हा व्हाट्सअप नंबर दिला असून ज्याला कुणाला या प्रकरणाची माहिती असेल ती त्यावर द्यावी असेही सांगण्यात आले आहे. सोबतच माहिती देणाऱ्याचे नाव कुठल्याही परिस्थितीत उघड केले जाणार नसल्याची ग्वाहीही देण्यात आली आहे. तसेच माहिती देणाऱ्याला बक्षीस देखील देण्यात येणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे.





पंकज कुमावत यांनी केली घटनास्थळाची पाहणी

बीड जिल्ह्याचे एस.पी. तथा महादेव मुंडे खून प्रकरणी नेमण्यात आलेल्या एसआयटीचे (SIT) प्रमुख पंकज कुमावत यांनी सोमवारी परळी येथे भेट देऊन तहसील समोरील मैदानात असलेल्या घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत एस.आय.टी. मधील सदस्य आणि परळी शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी देखील होते. यावेळी कुमावत यांनी संपूर्ण घटनाक्रम समजून घेतला, आता यानंतर तपासाला सुरुवात होणार आहे. महादेव मुंडे यांचे मारेकरी २१ महिन्यापासून मोकाटच आहेत. या अनुषंगाने या प्रकरणाच्या तपासाला वेग आला आहे. त्यातच आता या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी, असे आवाहन देखिल पंकज कुमावत यांनी केलं आहे.

# केजमधील रेणुका कलाकेंद्रावर पोलिसांचा छापा; दोन पीडित महिलांची सुटका, तिघांविरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ ऑगस्ट**

केज तालुक्यातील सारुळ गावाजवळील केज रोडवरील रेणुका कलाकेंद्रात चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (-क्ष्ण) बीड यांनी कारवाई करत दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणी मीना संतोष खराडे, शेख शफीक शेख हमीद आणि जागामालक रामनाथ ढाकणे (फरार) यांच्यावर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई ५ ऑगस्ट रोजी करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक पल्लवी जाधव (-क्ष्ण, बीड) यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, सारुळ गावातील रेणुका कलाकेंद्रात दोन महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात आहे. सदर माहितीच्या आधारे देविदास गात, पीएसआय पल्लवी जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मीरा रेडेकर, महिला पोलीस हवालदार उषा चौरे, शोभा जाधव, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार यांनी डमी ग्राहक व पंचासह सापळा रचून छापा टाकला.



डमी ग्राहकाने कलाकेंद्रात पोहोचल्यावर तेथील महिला एजंट मीना संतोष खराडे (वय ४०, रा. जुना धानोरा रोड, जीजाऊ नगर, संत कबीर गल्ली, बीड) हिने वेश्यागमनासाठी होकार देत ७,५०० रुपयांची मागणी केली. ठरलेली रक्कम देताच पोलिसांना इशारा मिळाल्यावर छापा टाकण्यात आला. मीना खराडे हिच्याकडून दिलेली रक्कम जप्त करण्यात आली.

सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. त्यांच्याकडून चौकशी केली असता, आरोपी मीना संतोष खराडे, शेख शफीक शेख हमीद (वय ३१, रा. कुर्बाण अलिशा नगर, दर्गा रोड, परभणी) आणि जागामालक रामनाथ ढाकणे (वय ५९, रा. सारुळ) यांनी त्यांना गुजरात व अन्य जिल्ह्यातून आणून आर्थिक फायद्यासाठी ग्राहकांकडून पैसे घेऊन वेश्या व्यवसाय करायला लावल्याचे समोर आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अ.मा.वा.प्र. कक्षाच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्धपणे व तडीने ही कारवाई करून महिलांची सुटका करत वेश्याव्यवसायाच्या विळख्यातून त्यांची मुक्तता

सदर घटनेत तीन आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ आणि ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

# पर्यावरण मंत्री मा.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ३००० वृक्षांची भेट; बीडमध्ये घनवनाचा प्रेरणादायी उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑगस्ट**

बीड जिल्ह्यातील घाटसावळी येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.चंद्रकांत फड यांनी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री मा.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी आपल्या स्वमालकीच्या जमिनीवर घनवन पद्धतीने तब्बल ३०००/ हजार वृक्षांची लागवड करून एक सजीव जंगल निर्मितीचा संकल्प केला आहे.या वृक्षारोपणामध्ये पिंपळ,वड,कांचन,अडुळसा,मेहंदी, इंग्रजीचिंच, कडूलिंब, करंज, सिताफळ, शंकेश्वर, हातगा, बेल, शेवगा, काटेसावर, सिसम, चिंच, कवटउंबर, तुळस, कढीपत्ता, आवळा, आपटा, गावठी आंबा, रातराणी, कनेर, जास्वंद, बांबू, तुती,कोरफड अशा स्थानिक आणि उपयोगी वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे. हे संपूर्ण रोपण स्थानिक सामाजिक वनीकरण,वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली व वनस्पती संशोधकांच्या सल्ल्याने यात प्रा. पाटील अरुण सर,वनपाल मोरे, वनरक्षक केदार,बांगर मॅडम,सुरवसे मॅडम,सत्य वृक्ष पूजा रचनाकार महेशजी खरे,डोमरी गुरुकुल मुख्याध्यापक चव्हाण अण्णा यांच्या सहकार्यानेकरण्यात आले आहे.या उपक्रमाच्या निमित्ताने वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना स्नेहभोजन, आरोग्य तपासणी आणि विविध सेवा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड तर प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा राज्य कार्यकारणी सदस्य सर्जेराव तात्या तांदळे, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम भाई जहांगीर,प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, बीड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील, बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ,वडवणी मंडळ अध्यक्ष सुखदेव रेडे,विलास मोमीन, रिपाई नेते सुभाष तांगडे, मा सरपंच नागेश शिंदे,प्रा. तिडके तेजस,विठ्ठल नाना शिंदे,विलास बामणे,संजय काळे,अमोल वडतीले,हरीश खाडे,आप्पासाहेब झोडगे,नरेश पवार,महादेव नागरगोजे,अशोक घोडके,वामन मुंडे,बाळासाहेब हावळे, अशोक मुंडे,सटवा भाऊ मुंडे,वचिष्ट मुंडे,सोमनाथ मुंडे,गोरख मुंडे,नारायण मुंडे,अशोक घिगे,बाबासाहेब शिंदे,गणेश पवार,ज्ञानेश्वर बांडे,शाम राऊत,अशोक वैद्य, अंगद देवडकर,सचिन तीपटे,विशाल वाघमारे,गोरख बाबर,सुन्दर लांडे,गोविंद कोळेकर,रमेश लांडे,गाडे सर,मुलानी सर,बडे सर,विठल लांडे,उजगरे,संजय फड जावळे, मुळे, सूत्र संचलन अजिनाथ शेरकर यांनी केले यांच्या सह कार्यक्रम संपन्न करण्यासाठी ज्यांनी परिश्रम घेतले असे सुबोध फड ,कृ उ बा स संचालक नितीन फड,संतोष खवतड, बारीक कडेकर, महेश खवतड,बाबू फड बीड विधानसभेतील सर्व नूतन पदाधिकारी यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता.

समाजाच्या सर्व थरातील नागरिकांना एकत्र आणून पर्यावरण संरक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा एक उत्कृष्ट नमुना या उपक्रमातून साकारण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत फड यांचे सामाजिक योगदान केवळ पर्यावरणापुरते मर्यादित नसून, ते तरुणांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात तसेच गोरगरिबांना मदत, सुसंस्कृत आणि जागरूक तरुण घडविण्याच्या कार्यातही सक्रियपणे सहभागी असतात. त्यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यातील बालाघाट डोंगररांग हिरवीगार करणे हे एक मोठे स्वप्न असून, त्यासाठी त्यांनी अनेक शासकीय, सामाजिक आणि राजकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

# पतंजलि योग समितीच्या शिबिरांचे विक्रमी द्विशतक ; ८० हजार साधकांना माजी सैनिक दत्ता लांब यांनी मोफत योग शिकवला

## माजी सैनिक दत्ता लांब यांचे कौतुकास्पद कार्य -आ.नमिताताई मुंदडा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ ऑगस्ट**

येथील पतंजलि योग समिती, अंबाजोगाई आणि ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच २०० वे निःशुल्क योग विज्ञान शिबिराचा सांगता समारोह आयोजित करण्यात आला होता. यावेळी पूज्य आचार्य बालकृष्णजी यांच्या जन्मदिनानिमित्त 'जडी बुटी दिवस' साजरा करण्यात आला.

शहर व तालुक्यातील विविध शाळा तसेच महाविद्यालयांतून 'योग दिंडी आपल्या दारी' या अभियानांतर्गत २०० योग विज्ञान शिबिरांतून तब्बल ८० हजारांहून अधिक विद्यार्थी आणि साधकांना मागील दीड वर्षांपासून योगाचे मोफत धडे देण्याचे काम पतंजलि योग समितीचे मुख्य योग प्रशिक्षक, माजी सैनिक, आयुर्वेदिक चिकित्सक दत्ता सदाशिव लांब हे करीत आहेत, त्यांच्या २०० व्या योग विज्ञान शिबिराच्या सांगता समारोहाचे आयोजन रविवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी येथील ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी मंजुषा दीदी (प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, अंबाजोगाई.) या होत्या तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आ.नमिताताई मुंदडा (केज विधानसभा मतदारसंघ), अनिकेत लोहिया (सचिव, मानवलोक), संजय गंभीरे (शहराध्यक्ष, भाजपा), सौ.स्वप्ना नितेश शिराळे (चेअरमन, आशा फौंडेशन, महाराष्ट्र राज्य.), धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई.), श्रीमती लक्ष्मी देवी (महिला सैनिक), मुख्य योग प्रशिक्षक दत्ता लांब व आयोजक दत्ता दराडे (संचालक, ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र.) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि विश्वशांती प्रार्थनेने झाली. यानंतर मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात पतंजलि योग समितीकडून योग शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना ब्रह्मकुमारी मंजुषा दीदी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी माजी सैनिक दत्ता लांब (योग शिक्षक व प्राकृतिक चिकित्सक) यांचा सत्कार केला. या प्रसंगी ब्रह्माकुमारी मंजुषा दीदी यांनी योग व ध्यानाचे महत्व समजावून सांगितले आणि पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभाशिर्वाद दिले, तर आ.नमिताताई मुंदडा यांनी मौलिक मार्गदर्शन करताना शुभेच्छा दिल्या. धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई) यांनी योग प्रोटोकॉल शिकविला, योगाचे महत्व विशद केले. तसेच यावेळी अनिकेत लोहिया, संजय गंभीरे, स्वप्ना शिराळे, लक्ष्मी देवी यांनी ही योग अभ्यास करण्याविषयी उपस्थितांना योग्य मार्गदर्शन केले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी लांब यांनी अवघ्या सात मिनिटांत फिटनेससाठी उपयुक्त ठरतील अशी योगातील विविध ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच 'शिवतांडव' द्वारे मान्यवरांचे स्वागत ही केले. या शिबीरात सहभागी सर्वांना मोफत योग शिक्षण देण्यात आले. तर लांब यांच्या 'योग दिंडी आपल्या दारी' या अभियानाची नोंद व आपण केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची माहिती व प्राप्त विविध संस्थांची प्रशस्तीपत्र लांब यांनी पतंजलि योगपीठ हरिद्वार, भारत स्वाभिमान न्यास येथे जमा केली. लांब यांनी केवळ साडेपाच मिनिटांत केली ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पतंजलि योगपीठ हरिद्वार येथील शिबिराचे सुप्रसिद्ध 'आस्था चॅनेल' वरून संपूर्ण जगभरात लाईव्ह प्रसारण करण्यात आलेले आहे. ज्याचा लाभ जगभरातील योग अभ्यासकांनी नेहमीच घेतला होता, माजी सैनिक लांब यांच्या कार्याची दखल घेऊन योगगुरू रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण व केंद्रीय प्रभारी, भारत स्वाभिमान यांनी कौतुक करून त्यांचा यथोचित सन्मान ही केला अशी माहिती या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालकांनी देवून उपस्थितांचे आभार मानले.



माजी सैनिक लांब यांचे कौतुकास्पद कार्य:

लांब यांच्या निःशुल्क, निस्वार्थ योगसेवेचे आम्ही स्वागत करतो आहोत. लांब हे भारतीय सैन्यात फिजीकल शिक्षक म्हणून कार्यरत होते. म्हणून त्यांच्या अनुभवाचा आणि मौलिक मार्गदर्शनाचा फायदा सैन्य, पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लाभदायक ठरत आहे. पतंजलि योग समितीच्या 'योग दिंडी आपल्या दारी' या समाजोपयोगी अभियानाचे ही विशेष कौतुक. दैनंदिन जीवनात योगाचे काय महत्त्व आहे. ते निःशुल्क शिकविण्याचे काम श्री.लांब हे करीत आहेत. अंबाजोगाई शहर व तालुक्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातून विद्यार्थ्यांसाठी १५,९,६,३,२ व १ दिवसीय अशा एकूण २०० योग प्रशिक्षण शिबीरे घेवून यात तब्बल ८० हजारांहून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना दिनचर्या, आहार, योगिक डि.बिन्द्रिक, प्राणायाम, सर्व प्रकारचे आसन, योगनिद्रा, ध्यान यांचा अभ्यास व योगाचे धडे देण्याचे मौलिक काम माजी सैनिक लांब हे करीत आहेत. २९ वर्षे भारतीय सैन्य दलात असताना देखील लांब यांनी दरमहा आपली आर्धी पगार गोर-गरीबांसाठी खर्च केली आहे. सैन्यात देशसेवा करून सेवानिवृत्तीनंतर मागील दीड वर्षांपासून अधिक काळ ते आपली आर्धी पेंन्शन सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करीत आहेत. ही खरच प्रेरणादायी व कौतुकास्पद बाब आहे. माजी सैनिक लांब हे योगाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. अंबाजोगाई शहर व परिसरातील युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक या साधकांना निःशुल्क, मोफत योग सेवा देवून त्यांचे स्वास्थ निरोगी राहण्यासाठी ते अहोरात्र प्रयत्नशील आहेत. माजी सैनिक योग प्रशिक्षक लांब यांनी योग क्षेत्रात अंबाजोगाईसह बीड जिल्ह्याचे नांव जगात उंचावले आहे.

सौ.नमिताताई मुंदडा
(आमदार, केज विधानसभा मतदारसंघ.)

योग शिबिरांना साधकांचा प्रतिसाद :


ज्या-ज्या संस्था, शाळा यांनी योग प्रशिक्षणासाठी पुढाकार घेतला. त्यांना यापूर्वी भारत स्वाभिमान न्यासकडून योगामध्ये उष्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र दिलेले आहे. युवा पिढीसाठी आम्ही योग शिबीरं आयोजित करीत आहोत. आजसह मिळून आयोजित एकूण सर्व २०० पेक्षा अधिक शिबिरांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ही सर्व शिबीरे विद्यार्थ्यांसाठी मोफत आयोजित करण्यात आलेली होती. तब्बल ८ हजार मुलींना देखील आम्ही निःशुल्क योग शिकविला आहे. या पुढेही मोफत योग प्रशिक्षण देण्याचे काम आम्ही निरंतर करणार आहोत, त्याचा लाभ अंबाजोगाईतील सर्व नागरिकांनी घ्यावा.

दत्ता लांब
(माजी सैनिक तथा योग प्रशिक्षक)

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची एकतर्फी विजयाकडे वाटचाल : सचिन स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

ना.पंकजाताई मुंडे आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दि वैद्यनाथ अर्बन बँक लि. निवडणूकित लोकनेते लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल ची एकतर्फी मोठ्या विजयाकडे वाटचाल सुरू झाली आहे.



मराठवाडा नव्हे तर राज्यातील अतिशय विश्वासहर्ता प्राप्त असलेल्या वैद्यनाथ बँक निवडणूकित विरोधकांनी विरोधाला विरोध म्हणून केविलवाणा प्रयत्न सुरू केले आहेत पण जनतेला सर्व बाबी न्यात असल्याने, लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल च्या सर्वच उमेदवारांना उत्स्फूर्तपणे प्रीतिसद मिळत असल्याने, आणि याअगोदर चार संचालक बिनविरोध निवडून आले असल्याने, विरोधकांचे आव्हान संपुष्टात आले आहे, त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी होणार हे जवळपास निश्चित झाले असल्याने, भविष्यात विरोधाला विरोध ही प्रवृती नामशेष करण्यासाठी, सर्वंच सभासदांनी भरघोस मतदान लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल च्या सर्वच उमेदवारांना द्यावे असे आव्हान युवक नेते सचिन स्वामी यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री पालकमंत्री अजित पवार यांचे जिल्ह्यात विविध कार्यक्रमाला उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑगस्ट**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दि. ७ ऑगस्ट, २०२५ रोजीचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे.

उपमुख्यमंत्री श्री.पवार हे दिनांक ०७ ऑगस्ट रोजी सकाळी ०६.३० वा. विविध विकास कामांची पाहणी करणार आहेत. यामध्ये चंपावती क्रीडा संकुल पाहणी , श्री क्षेत्र कालेश्वर मंदिर परिसर पाहणी करणार आहे. सकाळी ०९.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व इमारत बांधकाम पाहणी व महसूल भवनाचे भूमिपूजन करतील. सकाळी १०-०० वा श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखडा सादरीकरण / चर्चा. सकाळी १०.४५ वा. जिल्ह्यातील मुख्य इमारतीच्या Elevation Plan चे सादरीकरण व चर्चा. सकाळी ११.३०स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई -आराखडा सादरीकरण व चर्चा. दुपारी १२.३० ते १.३० राखीव. दुपारी ०१.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन. १) ऊसतोड कामगारांचा मेळावा . २) आरोग्य मित्र योजनेचा शुभारंभ. ३) ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) Chat Bot. दुपारी ०२.४५ वा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे आगमन. दुपारी ०२.४५ वा. Centre for Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT), By Tata Technologies, Beed चे भूमिपूजन करतील. दुपारी ०३.०० वा. खंडेश्वरी मंदिर परिसर, बीड येथे आगमन. दुपारी ०३.०० ते ०४.०० वा. जिल्ह्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमास उपस्थित राहतील. सांय ०४.१५ वा. स.मा. गर्गे पत्रकार भवन, तुळजाई चौक, बीड येथे आगमन व नंतर बीड जिल्हा पत्रकार संघाचा कार्यक्रमात उपस्थित राहतील. नंतर मोटारीने प्रयाण . सांय ०५-३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. रात्रौ ०९.२५ वा. छत्रपती संभाजीनगर विमानतळ, छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व ०९.३० वा. विमानाने पूणेकडे प्रयाण करतील.

# गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज खरोळा यांच्या श्रावण महिन्यातील अनुष्ठान निमित्त घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ ऑगस्ट**

येथील श्री गुरुलिंग स्वामी मंदिरात गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज खरोळा यांच्या श्रावणमास निमित्त २१ दिवशीय मौन अनुष्ठान सुरू असून अनुष्ठानाचा सोमवारी (ता.०४) ९ वा दिवस आहे. सोमवारी मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे दर्शन घेतले.



द्वादश ज्योतिर्लिंग प्रभुवैद्यनाथाच्या नगरीत श्री १०८ गुरु शंकर लिंग शिवाचार्य महाराज खरोळा यांचे श्रावण मास मौन अनुष्ठान सुरू असून ९ व्या दिवशी पशूसंवर्धन, पर्यावरण वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी भेट देवून गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी श्री गुरुलिंग स्वामी मंदिर देवस्थान ट्रस्ट, अनुष्ठान समितीच्या वतीने मंत्री ना. पंकजा मुंडे यांचा सत्कार ट्रस्टचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके, सचिव कॅड गिरीष चौधरी, विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, नारायण आप्पा खके, अनुष्ठान समितीचे अध्यक्ष दयानंद चौधरी, माजी नगरसेवक महादेव ईटके, विकास हालगे, वक्रेश्वर देवस्थानचे विश्वस्त दयानंद स्वामी, उल्लास ओपळे,प्रकाश खोत, महादेव आप्पा फडकरी, रमाकांत बुरांडे, रामलिंग राजनाळे, महात्मा हात्ते, नरेश पिंपळे, चंद्रकांत उदगीरकर, भाजपच्या शहराध्यक्षा उमाताई समशेट्टी, सुरेखा ताई मेनकुदळे, माधुरी मेनकुदळे, श्रीमती गोदावरी चौधरी, सुशील हरंगुळे, सचिन स्वामी, शिवकुमार चौंडे, अश्विन मोगरकर, संजय स्वामी,संजय कोरे, शिवराज इटके उमेश टाले गणेश हरगुळे, उमाकांत पोपडे,पवन तोडकरी, राहूल गोपनपाळे, योगेश मेनकुदळे, रोहन हालगे आदिंसह असंख्य महिला व भाविक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माजी खासदार भास्करराव खतगावकर यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ६ ऑगस्ट -**

मागील आठवडयात कै. सौ. स्नेहलता भास्करराव पाटील खतगावकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बुधवारी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या राजेंद्रनगर नांदेड निवासस्थानी भेट देउन माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर व खतगावकर कुंटूंबियांचे सांत्वन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व पवार कुटूंबीय खतगावकर कुटूंबाच्या दुःखात सहभागी आहोत खतगावकर कुटूंबास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशा भावना अजितदादांनी व्यक्त केल्या. अजितदादांनी कुटूंबियांसाठी पाऊनतास वेळ दिला.



याप्रसंगी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहणअण्णा हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, सरजीतसिंग गील, प्रवीण पाटील चिखलीकर, दिपक पावडे, अशोक पाटील मुगावकर, भास्कर भिलवंडे, राजू गंदीगूडे, बाळासाहेब पाटील खतगावकर, रवी पाटील खतगावकर, विकम देशमुख, राहुल हंबर्डे, साबेर चाउस, शिवराज पाटील होटाळकर, दिलीपराव धर्माधिकारी, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, वसंत सुगावे, मोहसीन खान, माधवराव पाटील सुगावकर, मंगल देशमुख, राजेश देशमुख, ज्ञानेश्वर कदम, दत्ताहरी पाटील कावळगुडेकर, रणजीत पाटील हिवराळे, बाबुराव कदम,जगनाथ चकावार, एन. डी. पवार, शिवाजी पाटील शिरुरकर आदि उपस्थित होते.

यावेळी खतगावकर पाटील कुटूंबातील सौ. ताराबाई, सौ. मंगलाबाई, बाळासाहेब पाटील, अरुण पाटील, डॉ. अनंत, डॉ. प्रतिमा, डॉ. अंजली, डॉ. मीनल पाटील, प्रमोद, सभापती रवी पाटील, अतुल, उद्योजक निरंजन पाटील, सौ.शुभांगी, सौ. अरुंधती, अनिकेत देशमुख, सौ. मीनाक्षी सोळंके, सौ. निशा देशमुख, ॲड. बाळकृष्ण शिंदे आदि उपस्थित होते.

# उत्तराखंड येथे गेलेले नांदेड जिल्ह्यातील सर्व यात्रेकरू सुखरुप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ६ ऑगस्ट -**

उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे आज ५ ऑगस्ट २०२५ रोजी परिस्थिती गंभीर आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली येथे ढगफुटी झाली असून ज्यामुळे खीरगंगा नदीला मोठा पूर आला आहे. अनेक घरांचे नुकसान झाले आहे आणि काही ठिकाणी भूस्खलन देखील झाले आहे. उत्तराखंडमध्ये अतिवृष्टी झाली आहे. अनेक ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. ज्यामुळे भूस्खलन आणि पूर आले आहेत. नांदेड जिल्ह्यातून बिलोली तालुक्यातील मौ. डोणगाव येथील ११ जण केदारनाथ बद्रीनाथ यात्रेसाठी १ ऑगस्ट रोजी नांदेड येथून निघाले होते त्यांचा संपर्क झाला आहे. ते सर्व सद्यस्थितीत घटनास्थळापासून १५० किमी दूर असून सर्व ११ जण सुखरूप असल्याचे जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्रास सचिन पत्तेवार यांनी कळविले आहे.

त्या अकरा जणांची नावे पुढील प्रमाणे आहेत. सचिन पत्तेवार वय २५,शिवचंद्र सुकाळे वय ३०,शिवा कुरे वय ३२,स्वप्निल पत्तेवार वय २५,शिवा ढोबळे वय २८,धनंजय ढोबळे वय २६,नागनाथ मुंके वय २८,देवानंद गौण्डगे वय २४,अमोल कुरे वय २८,सोमनाथ चंदापुरे वय २९, देवानंद चंदापुरे वय २७.

# भाजपा किनवट दक्षिण मंडळाची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. ६ ऑगस्ट -**

आगामी स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने व भारतीय जनता पार्टी संघटनात्मक मार्गदर्शनाच्या अनुषंगाने किनवट माहूर आणि इस्लापूर येथे भाजपाची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली.

किनवट माहूर विधानसभा क्षेत्राचे आमदार भीमराव केराम व नांदेड उत्तरचे भाजपा जिल्हा अध्यक्ष किशोरभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकांचे आयोजन करण्यात आली होते. किनवट दक्षिणचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनी इस्लापूर येथील साई मंगल कार्यालय येथे या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला भाजपाचे बाबुराव केंद्रे.भाजपा आदिवासी आघाडीचे गोविंद अंकुरवाड, किनवट दक्षिणचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांची प्रमुख उपस्थित होती.

या बैठकीदरम्यान उपस्थित भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भाजपाचे विधानसभाप्रमुख बाबुराव केंद्रे व आदिवासी आघाडीचे गोविंद अंकुरवाड यांनी भाजपाच्या संघटनात्मक संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले त्याचबरोबर हर घर तिरंगा, तिरंगा रॅली, रक्षाबंधन या संदर्भात महत्त्वाच्या सूचना दिल्या. या बैठकीला भाजपाचे विवेक केंद्रे भाजपा अनुसूचित जातीचे जिल्हा सरचिटणीस रवी कसबे, पंचायत समिती सदस्य तथा भाजपाचे माधवराव ढोकळे,भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस विकास माहूरकर, युवा मोर्चा जिल्हा सचिव शेख लतीफ

युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सुरज लासिनकर.भाजपा किनवट दक्षिणचे तालुका उपाध्यक्ष बालाजी पळसपुरे, सूर्यकांत बोधनकर, कपिल कांबळे, नंदकुमार दराडे, संदीप पानपत्ते, गजानन पालेपवाड, नागनाथ कांगणे, शिवा केंद्रे, प्रवीण माहुरकर, शिवाजी माने, बालाजी काळे, संतोष पेळे,अहमद सिद्दिकी, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप किनवट शहर मंडळाची बैठक उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ६ ऑगस्ट -**

भारतीय जनता पक्षाच्या शहर मंडळाची एक अत्यंत महत्वपूर्ण व रणनीतीत्मक बैठक (ता.०५) किनवट शहरातील कलावती गार्डन येथे उत्साहात संपन्न झाली. या बैठकीस आमदार भिमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली भरगच्च उपस्थितीमध्ये पार पडली. बैठकीत पक्षाच्या आगामी योजनांची माहिती देण्यात आली तसेच नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचा उत्साहवर्धन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आ. भिमराव केराम, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार व आनंद मच्छेवार, भाजपा नेते नारायणराव सिडाम, माजी नगराध्यक्ष दिनकरराव चाडावार, ओ.बी.सी. नेते बाबुराव केंद्रे, आदिवासी आघाडीचे प्रा. किशन मिरासे, माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनावार, माजी शहराध्यक्ष संतोष चनमनवार आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन भाजपा शहर मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. त्यांनीच कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

बैठकीदरम्यान बोलताना आ. भिमराव केराम यांनी पक्षाच्या आगामी अभियानांची सविस्तर माहिती कार्यकर्त्यांना दिली. त्यांनी सांगितले की, शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे त्यांनी पुढील अभियानांची माहिती देताना प्रत्येक बुथमधून किमान १०० राख्या राज्याचे लाडके नेते देवेंद्र फडणवीस यांना पाठवणे, 'हर घर तिरंगा' अभियान ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रभावीपणे राबवणे, रक्षाबंधन अभियानात बहिणींशी संवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया प्राप्त करणे, भाजपच्या विचारसरणीवर आधारलेले जनजागरण व बूथ स्तरावर संघटन मजबूत करणे या महत्वाच्या बाबींवर भर दिला.

यावेळी बाबुराव केंद्रे आणि प्रा. किशन मिरासे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करून पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

बैठकीचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात भाजपा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. शहरातील अनेक नवनियुक्त पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा शहर मंडळाने काटेकोर नियोजन केले होते. यामुळे या बैठकीद्वारे पक्ष संघटनेत नवचैतन्य संचारले असून आगामी अभियानांसाठी कार्यकर्ते सज्ज झाले असल्याचे चित्र दिसून आले.

## संक्षिप्त वृत्त

### भाजप सोशल मीडिया तालुका प्रमुखपदी गोपाल खापर्डे

**माहूर**-भारतीय जनता पक्षाच्या सोशल मीडिया माहूर तालुका प्रमुख पदी शहरातील भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते पत्रकार गोपाल खापर्डे यांची आ.भीमराव केराम यांच्या दुरदृष्टीपूर्ण पारखी नजरेच्या मार्गदर्शनातून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे आ.केराम यांच्यासह माहूर-किनवट विधानसभा मतदारसंघातील भाजपचे सर्व पदाधिकारी तथा त्यांचे स्नेहांकित मित्रमंडळी कडून जोरदार स्वागतासह अभिनंदन केले जात आहे. येथील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात मंगळवार दि.५ ऑगस्ट रोजी तालुकाध्यक्ष निळकंठ मस्के यांच्या अध्यक्षतेत तथा जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे, शहराध्यक्ष सागर महामुने यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपची संघटनात्मक बैठक पार पडली.या बैठकीत गोपाल खापर्डे यांची भाजपा सोशल मीडियाच्या तालुका प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. तांत्रिक कौशल्य, संघटन क्षमता आणि पक्षनिष्ठेचा उचित सन्मान या बाबींचा विचार करून आपल्यावर सोशल मीडिया प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली, असे गौरोद्गार शहराध्यक्ष गोपू महामुने यांनी काढले. जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे यांनी नियुक्तीपत्र दिल्यानंतर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खापर्डे यांचे अभिनंदन करत सत्कार केला. भाजपचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे, नगरसेवक राजेंद्र केशवे,युवा मोर्चाचे प्रदेश सचिव संदीप राठोड, अल्पसंख्यांक आघाडीचे तालुकाध्यक्ष फिरोज पठाण, माजी तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर, राहुल चव्हाण, मनीष राठोड, पद्मा गिऱ्हे, पांडुरंग राठोड, अपील बेलखोडे यांच्या सह अनेकांनी गोपाल खापर्डे यांच्या नियुक्तीचे स्वागत करून अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



### सुभाषराव पाटील माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना टिफिन बॉक्सचे

**कंधार**-ग्रामविकास शिक्षण संस्था चिखली तालुका कंधार संचलित, सुभाषराव पाटील माध्यमिक विद्यालय कळका या विद्यालयामध्ये दि.०४-०८-२०२५ रोजी, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय आमदार प्रताप पाटील चिखलीकर आणि संस्थेचे सचिव प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त डब्बे व वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने टिफिन बॉक्स भेट देण्यात आले याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोविंदराव पाटील गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून शावजी पाटील गायकवाड , रामचंद्र पाटील गायकवाड, विश्वनाथ पाटील गायकवाड, केशव पाटील गायकवाड, शिवराज मुंडकर पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक पुयड, सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रस्ताविक पर भाषणातून गायकवाड यांनी शाळेची प्रगती आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी शाळेत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाविषयी माहिती दिली. शाळेमध्ये कडुनिंब वड पिंपळ यासारख्या स्वदेशी रोपांची लागवड करण्यात आली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करतनाच पर्यावरण जनजागृती म्हणून वृक्ष संवर्धन आणि वृक्ष लागवड ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा देऊन आपली शिक्षणात उत्तरोत्तर प्रगती करावी असे सांगितले. कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव पुयड, सहशिक्षक सुदाम गायकवाड, प्रकाश बोडपवार, बळवंत कौसल्ये, ज्ञानेश्वर गुद्दे, शिवराज वडजे ,संतोष केंद्रे ,लिपिक दत्ता परांडे सेवक, सदाशिव मोरे ,मधुकर कांबळे, विद्यासागर गायकवाड हे सर्व कर्मचारी उपस्थित होते. अतिशय उत्साहाच्या वातावरणात हा कार्यक्रम घेण्यात आला.

# म्हशी धुण्यास गेलेल्या शेतकऱ्याचा तलावात बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ६ ऑगस्ट -**

तालुक्यातील मौजे लिंगणकेरूर येथील तलावात म्हशी धुण्यासाठी गेलेल्या पिराजी चांदू दिंडे नामक साठ वर्षीय शेतकऱ्याचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना ०४ ऑगस्ट रोजी दुपारी ०४.०० वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.



अधिक माहिती अशी की, पिराजी चांदू दिंडे हे शेतकरी दररोजप्रमाणे दिनांक ०४ ऑगस्ट रोजी सकाळी आपल्या गाई-म्हशी घेऊन शेताकडे गेले होते. दुपारनंतर म्हशी धुण्यासाठी तलावाकडे गेले असता, म्हशी धुताना त्यांचा पाय घसरून ते खोल पाण्यात पडले. पोहता न आल्यामुळे त्यांचा तलावातच बुडून मृत्यू झाला, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. ही घटना उशिरा लक्षात येताच ग्रामस्थांकडून मदतकार्य सुरू करण्यात आले. दरम्यान अंधार पडल्यामुळे ग्रामस्थांना मृतदेह शोधता आला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी (दि ०५ ऑग) मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसून येताच माजी पंचायत समिती सदस्य राजाराम कांबळे, सरपंच बालाजी कदम यांच्या माध्यमातून महसूल प्रशासन व देगलूर पोलिस प्रशासनास माहिती देण्यात आली. महसूल विभागाचे तलाठी व मंडल अधिकारी तसेच देगलूर पोलिस तात्काळ घटनास्थळी येऊन पंचनामा केला असून, या प्रकरणी पोलिस दफ्तरी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ते माजी सभापती संजय शिंगाडे यांचे काका व माजी सरपंच तथा पत्रकार सुधांशू कांबळे यांचे मेहुणे होत. दिनांक ०५ ऑगस्ट रोजी त्यांच्या पार्थिवावर गावातील सार्वजनिक स्मशानभूमीत साश्रुनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीच्या वेळी माजी सभापती संजय शिंगाडे,गावचे सरपंच बालाजी पाटील, पं.स.सदस्य राजाराम कांबळे, उपसरपंच मारुती पांडवे,पोलिस पाटील, ग्रामपंचायतीचे सदस्य माधव पा जाधव, हणमंत जाधव आनंद कदम, सुरेश बोंडगे, खंडू वाघमारे, चंद्रकांत वाघमारे सोपान पांडवे तडखेलचे माजी सरपंच आनंद दिंडे, निवृत्ती बजीरे, रामभाऊ वाघमारे,मारुती वाघमारे, मारुती कांबळे, आकाश कांबळे, सुरेश कांबळे तसेच अनेक ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेकांनी भावना व्यक्त करत त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले.

# 'लंपी' या आजारावर तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात : भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ६ ऑगस्ट -**

हदगाव तालुक्यात लंपी आजाराने ग्रस्त जनावरे आढळली आहेत. तामसा व परिसरात अनेक जनावर मृत्युमुखी झाल्याच्या बातम्या दैनंदिन वृत्तपत्रातुन आल्या आहेत. या परिसरातील शेतकरी याबाबत आपल्या गाय, बैल, वासर याबाबत मोठ्या चिंतेत आहे. तरी लंपी आजाराच्या प्रतिबंध बंदोबस्त व्हावा म्हणून संभाव्य उपाययोजना करत असतांना पुरेसा आवश्यक औषध साठा, आरोग्य तपासणी मोहीम, प्रभावित जनावरांचे विलगीकरण, सार्वजनिक पाणवठे (हौद) याबाबत पशुसंवर्धन विभागामार्फत व महाराष्ट्र पशु मत्स्य व विज्ञान विद्यापीठाच्या सहकार्याने जनजागृती मोहीम राबवावी. व शेतकऱ्यांना जनावरांना लंपीपासून वाचवण्याकरिता प्रशिक्षण व मार्गदर्शन द्यावे अशी मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त राजकुमार पडले यांच्याकडे महाराष्ट्र पशु मत्स्य व विज्ञान विद्यापीठाचे विस्तार व निरंतर शिक्षणचे सदस्य तथा भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी केली आहे.

मागील दोन वर्षापुर्वी आलेल्या लंपी आजारातुन पशुधन वाचवण्यासाठी सरकारी डॉक्टर सोबत खाजगी पशुवैदक पदविका धारक डॉक्टर यांनी मोठ्या प्रमाणात आजार आटोक्यात येईपर्यंत 'पशुसेवा हीच ईश्वर सेवा' या भावनेतून काम केला आहे त्यांची देखील या वेळेस मदत घेण्यात यावी,शासन स्तरावर लंपी आजार हा नैसर्गीक आपत्ती या धरतीवरील उपाययोजनेमधून गाय, बैल मृत्युमुखी पडल्यास मोबदला शेतकऱ्यांना मिळावा. सदर आजार आटोक्यात आणन्यासाठी लागणारा प्रशिक्षीत, खाजगी पशुवैदक, पदविकाधारक यांना शासन सेवेत नेमणुका कराव्यात,या विषयावर पशुसंवर्धन विभागाने दखल देवून योग्य ती तात्काळ कार्यवाही व उपाययोजना करावी अशी मागणी भागवत देवसरकर यांनी केली.

# आधुनिक तंत्रज्ञानाचे न्यू एज कोर्सेस आता देगलूरमध्ये उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ६ ऑगस्ट -**

कौशल्य, रोजगार, नाविन्यता व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या न्यू एज कोर्सेस योजनेंतर्गत देगलूर येथील अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सोलार टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या नवीन अभ्यासक्रमाची सुरूवात झाली आहे.

या कोर्ससाठी एकूण दोन युनिट असून एकूण ४० जागा उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक पात्रता ही किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर कोर्स आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर घडवण्याची सुवर्णसंधी देतो.

विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी वेळेत नोंदणी करून प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य, अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देगलूर, जि. नांदेड यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांना टिफिन बॉक्स चे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ६ ऑगस्ट -**

ग्रामविकास शिक्षण संस्था, चिखली ता. कंधार संचालित रत्नेश्वरी माध्यमिक विद्यालय, वडेपुरी या शाळेमध्ये संस्थापक अध्यक्ष प्रतापराव पाटील चिखलीकर आणि संस्थेचे सचिव प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला.

संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने टिफिन बॉक्स भेट देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना अल्पोपहार आणि फळांचे वाटप करण्यात आले.

**कार्यालय उमरी नगरपरिषद उमरी जि.नांदेड**
उमरी नगरपरिषद प्रशासकीय इमारत
ई मेल : coumari1@gmail.com

जा.क्र.उनप/सामान्य विभाग/ 986 /2025 दिनांक 06/08/2025

**कार्यालय उमरी नगरपरिषद उमरी जि.नांदेड**
**(जाहीर सुचना)**

नगर परिषद उमरी हद्दीतील सर्व दुकाने, संस्था, आस्थापना, मार्केट, संघटना, कार्यालये तसेच सर्व सुजान नागरिकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,2015 च्या कलम 3 अन्वये नगरपरिषद उमरी जि.नांदेड अंतर्गत नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या एकूण 70 लोकसेवाची सूची, आवश्यक कागदपत्रे, शुल्क, नियत कालमर्यादा, पद निर्देशक अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी आणि द्वितीय अपिलीय अधिकारी या बाबी खालील QR कोड मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करण्यात येत आहेत.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद उमरी जि.नांदेड

**किनवट नगरपरिषद, किनवट**
जिल्हा-नांदेड
नविन, प्रशासकीय इमारत, किनवट ता. किनवट जि. नांदेड
फोन क. (०२४६९-२२२१११) Email: cokinwatgmail.com

जा.क्र. बांधकाम विभाग/ १६३० /२०२५ दिनांक : ०६/०८/२०२५

**निविदा सुचना क्रं (१) सन. २०२५-२६**

किनवट नगर परिषद यांच्या वतीने शासन मान्य वाटदाराकडून खालील नमुद केलेल्या कामांची निविदा बी.१ नगुन्यात मागविण्यात येत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील पंजीकृत ठेकेदार यांनी दि. ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दि. १३/०८/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजे पर्यंत कोरे निविदा खरेदी करता येईल व भरलेली निविदा दि. १३/०८/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील प्राप्त. निविदा शक्य झाल्यास दि. १४/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा उघडण्यात येतील.

| अ. क्र | न.प. निधी अंतर्गवची कामे | अंदाजपत्रकीय किंमत | इसारा रक्कम | को-या निविदा प्रपत्राची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १) | Providing and Erecting Structural Steel sive in Length 4.5 MTR for Sabhamandap prabhag no.04 Islampura at Municipal Council Kinwat | १,९५,०००/- | २०००/- | ५००/- | ३० दिवस |
| २) | Providing and Eresting Structural Steel size in Length 3.5 MTR for Sablamandap prabhag no.04 Islampura at Municipal Council Kinwat | १,९९.०००/- | २०००/- | ५००/- | ३० दिवस |

**नियम, अटी व शर्ती नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर, बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील**

स्वा
(डॉ. अजय कुरवाडे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, किनवट